शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच


संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे

- **कार्यअहवाल : सन २०१८**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**
  **संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree



**दिनांक ६ जानेवारी २०१८**

**सावित्रीमाई फुले जयंती साजरी**

रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने सावित्रीमाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,संतोष शिंदे,अंजना गायकवाड,कोमल बोर्डे,मेघा आठवले,रोहित कांबळे नीरज भालेरावं उपस्थित होते.



पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित अभिवादन करण्यात आले.

# क्रांतीज्योतींना अभिवादन

**पिंपरी, दि. ७ (प्रतिनिधी) -** रयत विद्यार्थी मंचाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. संस्थेच्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला. कार्याध्यक्षा अंजना गायकवाड व सहसचिव मेघा आठवले यांच्या वतीने सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी सहसचिव मेघा आठवले आपल्या मनोगतात म्हणाल्या की, आजच्या स्त्रियांनी रूढी परंपरा यात गुरफटून न जाता सावित्रीमाईंच्या विचारांचं अनुकरण केले पाहिजे तरच स्त्रियांची प्रगती शक्य आहे. त्या भारताच्या प्रथम महिला शिक्षिका व समाज सुधारक होत्या. त्यांनी पती ज्योतिबा फुले यांच्या सोबतीने महिलांसाठी आयुष्यभर कार्य केले. अनेक त्रास सहन करून त्यांनी सर्व जातीधर्मांच्या महिलाना शिक्षित करण्याचे काम केले. यासाठी त्यांना प्रचंड विरोध सहन करावा लागला पण त्या कधीही डगमगल्या नाहीत. महिलांना शिक्षित करणे, विधवा महिलांचे विवाह करून देणे, अस्पृश्यता मिटवणे यासाठी त्यांनी आयुष्य वेचले.

महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष शशिकांत कुंभार, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, सचिव नीरज भालेराव, संघटक आदिनाथ कांबळे, शहर प्रतिनिधी रोहित कांबळे, अण्णा भंडारी, कोमल बोरडे, सतीश कदम उपस्थित होते.

प्रभात Mon, 08 January 2018
epaper.eprabhat.net//c/25221015

लोकमत

**महत्त्वाचे**

## सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**पिंपरी :** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच या संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या अध्यक्षतेखाली कार्याध्यक्षा अंजना गायकवाड व सहसचिव मेघा आठवले यांच्या वतीने सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष शशिकांत कुंभार, संदेश पिसाळ कार्याध्यक्षा गायकवाड, सचिव नीरज भालेराव, संघटक आदिनाथ कांबळे, शहर प्रतिनिधी रोहित कांबळे, अण्णा भंडारी, सदस्य कोमल बोरडे, सतीश कदम उपस्थित होते.

दिनांक ०८ जानेवारी २०१८









## दिनांक १५ जानेवारी २०१८
## राष्ट्रमाता जिजाऊ  जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



# पिंपरीत जिजाऊ जयंती साजरी

**पिंपरी** : रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे व रोहित कांबळे यांच्या हस्ते जिजाऊ च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली

दिनांक १६ जानेवारी २०१८



**दिनांक १९ जानेवारी २०१८**
**कल्याणकारी योजना प्रसिद्धीबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपंग बांधवांसाठी,महिलांसाठी,विद्यार्थांसाठी, मागासवर्गीयांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवत असते परंतु त्या योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचत नाहीत, या योजना सर्वसामान्यापर्यंत प्रसिद्धी मार्फत पालिकेने पोहचवाव्या यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने अतिरिक्त आयुक्त अष्टीकर साहेब यांना निवेदन देण्यात आले.

पुढारी

# कल्याणकारी योजनांच्या जनजागृतीची मागणी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नागरवस्ती विभागांतर्गत विद्यार्थी मित्र, अपंग बांधवांसाठी, महिलांसाठी व इतर नागरिकांसाठी, महिला व बालकल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना अपंग कल्याणकारी योजना अशा अनेक कल्याणकारी योजना महापालिकेतर्फे राबवल्या जातात; परंतु या योजनांचे लाभ फक्त कागदोपत्रीच दिसतात. त्या योजनांचा लाभ लोकांपर्यंत पोचविण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने आयुक्तांकडे करण्यात आली.

माहिती व ज्ञानाअभावी या योजना सामान्य लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. पालिकाही या योजना सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करताना दिसत नाही. त्यामुळे गरजू या योजनांपासून वंचित राहतात. या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्धिमाध्यमे, सोशल मीडिया, पत्रक, योजना पुस्तिका, माहिती फ्लेक्सद्वारा; तसेच सामाजिक संस्थांना कळवून त्यांच्या मार्फत जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकापर्यंत योजना पोहोचतील व गरजूंना त्याचा लाभ होईल.

My Pimpri
Page No. 04 Jan 21, 2018
Powered by: erelego.com

दिनांक २१ जानेवारी २०१८







## दिनांक २५ जानेवारी २०१८
## पाककला स्पर्धेचं आयोजन

जागतिक कन्या दिनानिमित्त मुलींमधील कलागुणांना ओळखून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून उर्दू माध्यमिक विद्यालय खराळवाडी आयोजित पाककला स्पर्धेचं आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये मुलींनी अतिशय उत्कृष्ट असे गोड व चविष्ट पदार्थ बनवले होते.या कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती/परीक्षक मा. मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, अझहर सर, रयत विद्यार्थी विचार मंचाचे अध्यक्ष्य धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते.


प्रभात

13/18

# उर्दू विद्यालयात पाककला स्पर्धा

**पिंपरी** – जागतिक कन्या दिनानिमित्त मुलींमधील कलागुणांना ओळखून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून खराळवाडीतील उर्दू माध्यमिक विद्यालयात पाककला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थिनींनी विविध पाककृती सादर केल्या. मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, अझहर, रयत विद्यार्थी विचार मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते. यावेळी प्रथम क्रमांक सानिया कुरेशी, व्दितीय क्रमांक ऐश्वरी शेख, तृतीय क्रमांक सीमा शेख, चतुर्थ क्रमांक स्वलेहा, शिफा सय्यद आणि पाचवा क्रमांक जहेद शेख यांनी पटकावला.

दिनांक २६ जानेवारी २०१८







## दिनांक २६ जानेवारी २०१८

## प्रजासत्ताक दिन

प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक येथे ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून कार्यक्रम संपन्न झाला.



पुढारी

# ‘विद्यार्थी देशाचे भावी संरक्षक’

**पिंपरी : प्रतिनिधी**

आजचे विद्यार्थी देशाचे भावी संरक्षक आहेत. यासाठी विद्यार्थ्यांवर होणारे संस्कार महत्त्वाचे आहेत. स्वतःचे ध्येय, देशाचे रक्षण व पालकांप्रती आदराची भावना या गोष्टी असतील तरच जीवनाला अर्थ प्राप्त होतो, असे मत निवृत्त कॅप्टन दादासाहेब म्हेत्रे यांनी व्यक्त केले.

थेरगाव येथील प्रेरणा शिक्षण संस्थेच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे मानद सचिव कांतीलाल गुजर, संस्थेचे प्रशासन अधिकारी विलास दसाडे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, प्राचार्य यशवंत पवार, मुख्याध्यापक सुनील सोनवणे, पर्यवेक्षक धनसिंग साबळे आदी उपस्थित होते.

यावेळी दादासाहेब म्हेत्रे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीचे, देशप्रेमाचे महत्व अंगी बाणवलेच पाहिजे, असे आवाहन केले.

कांतीलाल गुजर यांनी आपण संविधानाचा आदर करत राष्ट्रीय एकात्मता जपली आणि जोपासली पाहिजे. क्रांतिकारक, स्वातंत्र्य सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत एक जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये समजून घेतली पाहिजेत असे सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे, लेझीम, पंचरंगी कवायत, समूहगीत सादर केले. भिमराज शिरसाट यांनी सूत्रसंचालन केले.

**स्वामी विवेकानंद शाळेत प्रभातफेरी**

**पिंपरी** : नवनगर शिक्षण मंडळाचे श्री स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर शाळेत प्रजासत्ताकदिनानिमित्त विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली.

शाळा कमिटीचे अध्यक्ष बापू घोलप यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक प्रा. गोविंद दाभाडे, मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते सादर केली.

**रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे प्रजासत्ताकदिन साजरा**

**पिंपरी** : रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील संविधान प्रास्ताविक यास मंचाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सर्वांनी राष्ट्रध्वजास सलामी देत राष्ट्रगीत गाऊन प्रास्ताविकाचे वाचन केले.

याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, शशिकांत कुंभार, सहसचिव मेघा आठवले, सचिव नीरज भालेराव, शहर प्रतिनिधी रोहित कांबळे, कोमल बोराडे, अनिल भंडारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मंचाच्या माध्यमातून शोषित, पीडित, वंचित विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणे, शैक्षणिक विकासासाठी सतत कार्यरत राहून गरीब गरजू विद्यार्थ्यांना घडवण्याची प्रतिज्ञा घेतली.

**घोलप महाविद्यालयात एन.सी.सी. कॅडेट्सची राष्ट्रध्वजाला मानवंदना**

**पिंपरी** : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबूरावजी घोलप महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्सनी शिस्तबद्ध संचलन करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

या वेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

My Pimpri
Page No. 03 Jan 30, 2018

दिनांक ३० जानेवारी २०१८



दिनांक ३० जानेवारी २०१८

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिकेने शाळांमधील संगणक दुरुस्त करून व ज्या ठिकाणी संगणक नाहीत त्या ठिकाणी संगणकाचा पुरवठा करावा या मागणीचे निवेदन आयुक्त व माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांना देण्यात आले.

दिनांक ०४ फेब्रुवारी २०१८



पुढारी

# महापालिकेच्या शाळांमधील बहुतांश संगणकांमध्ये बिघाड

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये महापालिकेने उपलब्ध केलेल्या संगणकांमध्ये बिघाड झाल्यामुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याची दखल घेत शाळांतील संगणकांची पाहणी करून नादुरुस्त संगणक दुरुस्त करावेत व ज्या ठिकाणी संगणक उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी संगणक उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे.

याबाबत मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी

## दुरुस्तीची रयत विद्यार्थी मंचची मागणी

म्हटले आहे की, संगणकात बिघाड झाल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचे फॉर्म व विविध फॉर्म भरता येत नाहीत. काही शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या जास्त व संगणक कमी अशी परिस्थिती आहे. त्याचप्रमाणे आकुर्डीतील उर्दू माध्यमिक विद्यालय; तसेच शहरातील इतर ६ उर्दू माध्यमिक शाळांतील असे एकूण ३३५ विद्यार्थी मार्च २०१८ ला एसएससी बोर्ड परीक्षेला बसले आहेत. एसएससी बोर्डाकडून घेण्यात येणाऱ्या आयसीटी विषयाच्या प्रॅक्टिकल परीक्षा व कल चाचणीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याला एक संगणक आवश्यक आहे. या परीक्षेसाठी जिल्हा परिषदेकडून या विद्यालयास आयसीटी लॅब उपलब्ध नाही; तसेच या विद्यालयाला फक्त सहा संगणक असल्याने बजाज कंपनीकडून या विद्यालयास २० संगणक भेट म्हणून मिळालेले आहेत. उर्दू विद्यालयातील २० संगणक यंत्रणांसाठी संगणक कक्षात व इतर शाळांमध्ये संगणक व इंटरनेट व लॅनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे सोईस्कर होईल व विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.

My Pimpri
Page No. 04 Feb 04, 2018
Powered by: erelego.com





**दिनांक ८ फेब्रुवारी २०१८**

**रयत विद्यार्थी विचार मंच (मावळ तालुका)**

तळेगाव(दाभाडे)स्टेशन वरून ओव्हळे गावाला जाणारी एसटी वारंवार तांत्रिक बिघाडामुळे बंद पडत असते त्यामुळे विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होते व नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो त्यासाठी या गावाला दुसरी बस द्यावी किंवा चांगल्या प्रकारे दुरूस्ती करावी.या संदर्भात मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे यांनी अधिकार्यांशी चर्चा करून या मागणीचे निवेदन परिवहनमंडळ अधिकाऱ्यांना दिले. यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, सतिश वाघमारे, निखिल(बंटी)यादव, वैभव केदारी, शुभम कदम, आदी विद्यार्थी उपस्थित होते.




**वडगाव :** ओव्हळे येथे एसटी बस सेवा सुरळीत करावी, याकरिता विद्यार्थ्यांनी एसटी आगार विभागाला निवेदन दिले.

# मावळातील ओव्हळे गावाची एसटी बस व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी

**तळेगाव दाभाडे, दि. १० (वार्ताहर) –** तळेगाव–दाभाडे स्टेशन वरून ओव्हळे गावाला जाणारी एसटी वारंवार तांत्रिक बिघाडामुळे बंद पडत असते. त्यामुळे विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होते. नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो, त्यासाठी गावाला दुसरी बस द्यावी किंवा चांगल्या प्रकारे दुरूस्ती करावी. या संदर्भात रयत विद्यार्थी विचार मंचचे मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे यांनी परिवहन महामंडळ अधिकाऱ्यांशी चर्चा करून या मागणीचे निवेदन दिले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन महामंडळ अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, सतिश वाघमारे, निखिल (बंटी) यादव, वैभव केदारी, शुभम कदम आदी विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ०९ फेब्रुवारी २०१८



दिनांक :- 05/02/2018

प्रति,
धम्मराज साळवे.
संस्थापक अध्यक्ष
रयत विद्यार्थी विचार मंच
पिंपरी पुणे.

विषय :- 10 वी मध्ये शिकणाऱ्या माझ्या मुलीला न्याय मिळणेबाबत

महोदय,
मी नासिर अन्सारी पिंपरी येथे रहात असुन माझी मुलगी ~~आशीन~~ नाझनीन नासिर अन्सारी ही इयत्ता 9 वी पर्यंत मास्टरमाईंड इंग्लिश मिडियम स्कुल भोसरी या ठिकाणी शिकत होती. पुढील शिक्षण इयत्ता 10 वी S.S.C बोर्ड शिक्षणासाठी मास्टरमाईंड येथे SSC वर्ग मान्यता नसल्याने तिला क्रिस्टेलिया निगडी येथे वर्ग करण्यात आले परंतु ती मानसिक रित्या सक्षम नाही असे कारण पुढे करुन तिला परिक्षेसाठी पात्र ठरवत नाहीत व हॉलतिकीट देण्यास नकार देतात.
तरी तिला पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असुन तिला शिक्षण घेण्यासाठी सहकार्य करावे. व तिला न्याय मिळवुन द्यावा ही नम्र विनंती

आपला विश्वासु
नासिर अन्सारी.

Scanned with CamScanner

**दिनांक ०९ फेब्रुवारी २०१८**

**विद्यार्थीनीला मिळवून दिला न्याय**

SSC विद्यार्थीनीचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याचे विद्यालयाकडून हमी पत्र मिळवून तिच्या पालकांना देताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे



## दिनांक १७ फेब्रुवारी २०१८

## उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक समाज कल्याणच्या वस्तिगृहांची दुरावस्था

उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक समाज कल्याणच्या वस्तिगृहांची दुरावस्था झाली आहे.अनेक वस्तिगृह मोडकळीस आली असुन मुलांच्या जीवितास धोका आहे विद्यार्थी जीव मुठीत घेऊन राहतात.मुलांना वस्तिगृहांमध्ये जेवण नित्कृष्ट दर्जाच दिल जात.परंतु उस्मानाबादचे समाजकल्याण अधिकारी यावर काहीच कार्यवाही करत नाही.यासाठी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने विद्यार्थांच्या जीवितांशी खेळणार्या अकार्यक्षम अधिकार्यांवर कडक कार्यवाही करून लवकरात लवकर वस्तिगृहांची दुरूस्ती करण्यात यावी

या मागणीचे निवेदन संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे व व सचिव निरज भालेराव यांच्या हस्ते पुणे समाजकल्याण उपायुक्त यांना देण्यात आले.त्यांच्यावर लवकरात लवकर कार्यवाही करू असे आश्वासन त्यांनी दिले...



**दिनांक १८ फेब्रुवारी २०१८**

**भिडे वाडा समरणपत्र**

शैक्षणिक क्रांती करणार्या भिडे वाड्याच राष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रुपांतर व्हावे याकरिता पालकमंत्री गिरीश बापट यांनी स्मारकाची प्रकिया सुरू करण्याचे आदेश दिले होते.परंतु या निर्णयाला २ महिने उलटुन गेले तरी अद्याप पर्यंत कोणतेही पाऊल उचलले नाही याकरिता पुणे निवासी जिल्हाधिकारी यांना स्मरणपत्र देण्यात आले



**दिनांक १९ फेब्रुवारी २०१८**

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या मार्गदर्शनखाली शिवजयंतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला .





## दिनांक २२ फेब्रुवारी २०१८

## महानगरपालिकेने विद्यार्थी वैद्यकीय विमा,जीवन विमा काढण्यात यावा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३६ शाळा कार्यरत असुन या शाळांमध्ये ४९५७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या सर्व विद्यार्थ्यांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वैद्यकीय विमा,जीवन विमा काढण्यात यावा या मागणीचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली महासचिव संतोष शिंदे व सचिव निरज भालेराव यांच्या हस्ते ऊपायुक्त प्रविण अष्टीकर व स्थायी सभापती अध्यक्षा सिमा सावळे यांना देण्यात आले लवकरच ह विषय मुख्य पटलावर घेऊ असे आश्वासन ऊपायुक्तांनी दिले...

## 'शालेय विद्यार्थ्यांचा विमा मंजूर करावा'

**पिंपरी :** महापालिकेच्या शाळेत आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेतात; परंतु अपघात झाल्यास त्यांच्याकडे उपचारासाठी पुरेसे पैसे नसतात. यासाठी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विमा योजना सुरू करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे करण्यात आली. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून, निवेदनात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महापालिकेच्या अनेक शाळा रस्त्यालगत; तसेच रहदारीच्या ठिकाणी आहेत; तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा खबरदारी घेत नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे; तसेच विद्यार्थ्यांना अपघात घडला, तर या विद्यार्थ्यांच्या पालकांना परवडत नाही. पुणे महापालिकेने शालेय विद्यार्थ्यांसाठी विमा मंजूर केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय विमा व जीवन विमा मंजूर करावा, अशी मागणी महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पुण्य नगरी | शुक्रवार, २३ फेब्रुवारी २०१८

## शाळांमधील विद्यार्थ्यांचा विमा उतरवा

| पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या १३६ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचाने केली आहे. महापालिका शाळांमध्ये केवळ झोपडपट्टी व शोषित, पीडित, वंचित कुटुंबातीलच विद्यार्थी शिक्षण घेतात. महापालिकेच्या अनेक शाळा या रहदारीच्या ठिकाणी व रस्त्यालगत आहेत. त्यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांचे अपघात घडत असून विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला आहे. यासाठी महानगरपालिकेने महापालिकेच्या सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा, जीवन विमा उतरवणे गरजेचे असल्याचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, नीरज भालेराव यांनी महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रवीण अष्टीकर व स्थायी सभापती अध्यक्षा सीमा सावळे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

प्रभात

## पालिकेच्या विद्यार्थ्यांचा विमा उतरवा

**पिंपरी, दि. २५ (प्रतिनिधी)** – महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा विमा उतरवण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने सहायक आयुक्त प्रवीण अष्टीकर व स्थायी सभापती अध्यक्षा सिमा सावळे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली. त्यात म्हटले आहे की, महापालिकेच्या १३६ शाळा कार्यरत असून ४९ हजार ५७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. झोपडपट्टी, शोषित, पिडीत, वंचित कुटुंबातीलच विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेतात. अनेक महापालिकेच्या शाळा या रहदारीच्या ठिकाणी व रस्त्यालगत आहेत. अनेकदा विद्यार्थ्यांचे अपघात होतात. सर्वसामान्य पालकांना खासगी रुग्णालयात उपचार घेणे शक्य नसते. त्यामुळे महापालिकेने महापालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांचा विमा काढण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. हा विषय सभापटलावर घेण्याचे आश्वासन प्रवीण अष्टीकर यांनी दिले.

दिनांक २३ फेब्रुवारी २०१८



## दिनांक २३ फेब्रुवारी २०१८

## शिवज्योत आणणार्या ट्रक अपघातातील मृत्युमुखी पडलेल्या ०५ विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडुन आर्थिक मदत मिळवुन आधार द्यावा

शिवजयंतीनिमित्त कोल्हापुर येथुन शिवज्योत आणणार्या ट्रक अपघातातील मृत्युमुखी पडलेल्या ०५ विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडुन आर्थिक मदत मिळवुन आधार द्यावा.व जखमी विद्यार्थांवर मोफत ऊपचार करावेत या मागणीचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने पुणे निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना देण्यात आले. जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांनी हे निवेदन लगेच सांगली जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवुन त्यांना मदत मिळवुन देण्याचे आश्वासन दिले.





**दिनांक २४ फेब्रुवारी २०१८**

**दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप_समारंभ**

उर्दु माध्यमिक विद्यालय,खराळवाडी येथे दहावी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख उपस्थिती मध्ये विद्यार्थी मित्रांना मार्गदर्शन करताना व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर

प्रभात

3/16

सामाजिक कार्याची दखल घेत, या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. समाज कार्याची दखल घेत, केलेला सत्कार हा पुढील कार्याला प्रेरणा देतो, अशी प्रतिक्रिया भोरे यांनी यावेळी दिली.

## खराळवाडीतील उर्दू माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**पिंपरी –** महापालिकेच्या खराळवाडी येथील उर्दू माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, केंद्र प्रमुख देशमुख, सलाम इनामदार, अझहर शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे यांनी परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन करत अभ्यास कसा करावा, वेळेचं नियोजन कस असावं, विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी, पुढील वाटचाल कशी असावी याबाबत माहिती दिली. मुस्लिम समाजातील बरेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, दहावी होताच शिक्षण बंद करतात. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेत देश हितासाठी स्वतःला झोकून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मुस्लिम समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय उभारावे यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे धम्मराज साळवे यांनी केले.

पुढारी



## उर्दू विद्यालय दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**पिंपरी :** शालेय जीवन संपून आता महाविद्यालयीन जीवनास सुरुवात होईल. शाळेच्या आठवणी नेहमीच स्मरणात राहण्यात यासाठी येथील उर्दू माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ घेण्यात आला.

याप्रसंगी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे, मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, केंद्र प्रमुख देशमुख, सलाम इनामदार आदी उपस्थित होते.

यावेळी धम्मराज साळवे यांनी प्रमुख उपस्थित विद्यार्थ्यांना दहावी बोर्ड परीक्षा संदर्भात मार्गदर्शन करत परीक्षेचा अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कस असावे, यावर विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करत भविष्यातील संधी व पुढील वाटचाल कशी असावी हे स्पष्ट केले. मुस्लिम समाजातील बरेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहतात.यामुळे विकास करणे अवघड ठरते. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनि उराशी स्वप्न बाळगून उच्च शिक्षण घेत मोठ्या पदावर जावे व देश हिताचे कार्य करावे असे आवाहन केले.

Pimpri Edition
26 Feb, 2018 Page No. 5
Powered by : erelego.com

दिनांक २६ फेब्रुवारी २०१८



दिनांक २ मार्च २०१८

महाराष्ट्रातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करा रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले साहेब यांच्याकडे मागणी

पुढारी

# ‘विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करा’

## रयत विद्यार्थी मंचतर्फे आठवले यांना साकडे

**पिंपरी :** महाराष्ट्रातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती कमी प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणाचा खर्च भागविता येत नाही. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी, अशा मागणीचे रयत विद्यार्थी मंचच्या वतीने सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांना साकडे घालण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अनेक विद्यार्थी हे अतिशय गरिबीच्या व हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण घेतात. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमधूनच या विद्यार्थ्यांचे शिक्षण होते; पण सध्याची परिस्थिती पाहता मिळणारी रक्कम ही अल्प असून, यामध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होत नाही. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृती मिळत नाही. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी बँकेत खाते काढायला सांगितले जाते; परंतु विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष संपून गेले तरी खात्यावर शिष्यवृत्ती जमा होत नाही. शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे अनेक खासगी संस्था या विद्यार्थ्यांना पूर्ण फी भरण्याची सक्ती करतात; अन्यथा परीक्षेला बसू दिले जात नाही. यामुळे विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना कर्ज काढून फी भरावी लागते, नाहीतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करावे लागते.

अनेक सरकारी शाळांमध्ये देखील फक्त आर्थिक, शोषित, पीडित, वंचित, कुटुंबातीलच विद्यार्थी शिक्षण घेतात. आर्थिक परिस्थितीअभावी चांगल्या शाळांमध्ये या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येत नाहीत. नाईलाजाने आई-वडील आपल्या पाल्यांना सरकारी शाळांमध्ये पाठवतात; परंतु अनेक सरकारी शाळांची परिस्थिती दयनीय आहे. इंग्लिश मीडियमच्या जमान्यात दिवसेंदिवस सरकारी शाळांचा दर्जा घसरत चालला आहे. सरकारी शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. राज्य शासन याकडे वारंवार दुर्लक्ष करत आहे म्हणूनच पटसंख्येअभावी राज्यातील १३०० शाळा बंद करण्याची वेळ शासनावर आली आहे. स्पर्धेच्या व इंग्लिश मीडियमच्या युगात सरकारी शाळांचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर सरकारी मराठी शाळा डिजिटल झाल्या पाहिजेत. मराठी शाळेत पण इंग्लिश विषयाचे शिक्षण दिले पाहिजे, तरच पटसंख्या कायम राहील व मराठी शाळा टिकतील. त्यामुळे स्वतः दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यासाठी व सरकारी शाळांची गुणवत्ता व शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली. धम्मराज साळवे, संतोष शिंदे, संदेश पिसाळ, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, रोहित कांबळे, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, अनिल भंडारी, मेघा आठवले, अतुल वाघमारे आदी या वेळी उपस्थित होते.

Pimpri Edition
3 Mar, 2018 Page No. 5
Powered by : erelego.com

दिनांक ०३ मार्च २०१८





### दिनांक ५ मार्च २०१८
### रोडरोमियोंवर कारवाई करावी

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील महाविद्यालय,आणि शाळेतील विद्यार्थिनींना नाहक त्रास देणाऱ्या रोडरोमिओंवर कारवाई करावी व पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी निवेदन पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांना देण्यात आले.



**शहरातील विद्यार्थिनींना रोडरोमियोंचा त्रास**

**। पिंपरी : प्रतिनिधी**

शहरातील महाविद्याल्यांच्या परिसरात अनेक रोडरोमियो कर्कश हॉर्न वाजवून गाड्यांवर फिरताना दिसतात. याचा नाहक त्रास संबंधित महाविद्याल्यातील विद्यार्थिनी आणि शिक्षकांना सहन करावा लागत आहे. याला आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणेने विशेष पथक नेमावे. तसेच शाळा-महाविद्यालयांबाहेर गस्त वाढवण्याची मागणी रयत विद्यार्थी विचारमंचाचे धम्मराज साळवे यांनी केली.

याबाबत साळवे यांनी पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांना निवेदन दिले आहे. अनेक रोडरोमियो महाविद्यालयाच्या परिसरात कर्कश आवाजात हॉर्न वाजवत गाड्यांवर फिरतात. महाविद्यालय किंवा शाळा सुटल्यानांतर विद्यार्थिनींना त्रास देण्याचे सत्र सुरू होते. हे रोडरोमियो शिक्षक व प्राचार्य आणि गेटवरील सुरक्षारक्षकांनादेखील जुमानत नसल्याने याचा त्रास विद्यार्थ्यांसह शिक्षकांना सहन करावा लागतो. समाजात मुलींच्या शिक्षणाबाबत उदासीनता दिसते. अशातच रोडरोमियोंमुळे विद्यार्थिनींना शिक्षण सोडून देण्याची वेळ आली आहे.

# रोडरोमिओंचा बंदोबस्त करा

## रयत विद्यार्थी मंचची मागणी : पोलीस उपायुक्तांना निवेदन

**पिंपरी, दि. ६ (प्रतिनिधी)** - शहरातील रोडरोमिओंची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे विद्यार्थिनींना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याप्रकरणी जातीने लक्ष घालून भयमुक्त वातावरण निर्माण करण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड हे राष्ट्रीय पातळीवर कामगार, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेले शहर आहे. विद्येचे माहेर घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरालगत असलेले पिंपरी-चिंचवड शहर हे सुद्धा अल्पावधीतच शैक्षणिक बाबतीत नावारूपाला आले आहे. अनेक

**छेडछाडीचे प्रमाण वाढले : विशेष पथक नेमण्याची मागणी**

शैक्षणिक संस्था, महाविद्यालये शहरात निर्माण झाली. आज महाराष्ट्रातील व बाहेरील अनेक ठिकाणाहून विद्यार्थिनी पिंपरी-चिंचवडमध्ये शिक्षणासाठी येतात. परंतु आज शहरात गुंडगिरीचे प्रमाण वाढलेले आहे. अनेक रोडरोमिओ महाविद्यालयाच्या आवारात गाड्यांचे कर्कश आवाजाचे हॉर्न वाजवत फिरतात. ते शिक्षकांना देखील जुमानत नाहीत. गेटवरील सुरक्षा रक्षकांना त्रास देतात. शाळा, महाविद्यालय सुटल्यानांतर विद्यार्थिनींना छेडछाड करतात. शहरातील आकुर्डी, चिंचवड, पिपरीगाव, संत तुकारामनगर याठिकाणी तसेच इतर सर्व शाळा व महाविद्यालयाच्या परिसरात रोडरोममिओंचे जास्त प्रमाण आढळून येतात. राजकीय वरदहस्ताने बेभान होऊन, कोणालाही न जुमानणाऱ्या रोडरोमियोंसाठी विशेष पथक नेमून व पोलीस यंत्रणेने शाळा महाविद्यालयाबाहेर गस्त वाढून अश्या रोडमियोंवर कार्यवाही करावी व त्यांना आळा घालावा अशी मागणी या निवेदनात केली आहे. या निवेदनावर संतोष शिंदे, संदेश पिसाळ, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, रोहित कांबळे, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, अनिल भंडारी, मेघा आठवले, अतुल वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रभात Wed, 07 March 2018
epaper.eprabhat.net//c/26819317

**दिनांक ०७ मार्च २०१८**



**दिनांक ०८ मार्च २०१८**

**रोडरोमियोंवर कारवाई सुरु**

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील महाविद्यालय,आणि शाळेतील विद्यार्थिनींना नाहक त्रास देणाऱ्या रोडरोमिओंवर कारवाई करावी व पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांच्याकडे करण्यात आली होती.







**दिनांक ९ मार्च २०१८**

**जागतिक महिला दिन**

जागतिक महिला दिनानिमित्त प्रोग्रेस कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट आयोजित कार्यक्रमात महिला समोरील आव्हाने आणि संधी या संदर्भात मार्गदर्शन करताना धम्मराज साळवे (संस्थापक अध्यक्ष-रयत विद्यार्थी विचार मंच) यावेळी उपस्थित महिलांचा धम्मराज साळवे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मा. ललिता भंडारे (संचालिका),ललिता कांबळे, व इ. उपस्थित होते











## दिनांक २९ मार्च २०१८

## शैक्षणीक कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान

प्रथम संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शैक्षणीक कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख ऊपस्थितीत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर व पिंपरी चिंचवड शहर प्रमुख रोहित कांबळे ऊपस्थित होते यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी ऊपस्थित महिलांना मार्गदर्शन केले..







## दिनांक ११ एप्रिल २०१८
## महात्मा फुले जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली व तसेच उपाध्यक्ष संदेश पिसाळ व पिंपरी चिंचवड शहर प्रमुख रोहित कांबळे यांनी वाढदिवसाचा खर्च टाळुन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अनोखे अभिवादन करण्यासाठी ०५ हजार रूपये किंमती च्या महापुरूषांच्या विचारांचा पुस्तकांचा संच "बहुजन हिताय बहुजन सुखाय" या वाचनालयाला देण्यात आला. यावेळी वाचनालयाचे संचालक गिरीशजी वाघमारे यांच्याकडे पुस्तके सुपुर्त करताना रयत विद्यार्थी विचार मंचाचे संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व सर्व पदाधिकारी..







## दिनांक १२ एप्रिल २०१८
## बिस्लरी बॉटल स्टॉल

पिंपरी येथे महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या वतीने ११ एप्रिल ते १४ एप्रिल जयंती मोहत्सव असतो यानिमित्ताने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिण्याच्या पाण्याचा बिस्लरी बॉटल स्टॉल लावण्यात आला होता. त्याचे उद्घाटन पिंपरी पोलिस निरिक्षक मा.मधुसुदन घुगे साहेब व संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते करण्यात आले.यातुन जो नफा होईल तो विद्यार्थांच्या शैक्षणिक हितासाठी वापरण्यात आला.



## दिनांक २३ एप्रिल २०१८

## नागरिकांसाठी माफक दरात उपहारगृहाची निर्मिती करावी

अनेक वेळा सामान्य नागरिक, विद्यार्थी आपले प्रश्न घेऊन विविध सरकारी कार्यालयात येत असतात. काही वेळा अधिकारी हजर नसल्यामुळे किंवा उशिरा येत असल्यामुळे नागरिकांना, विद्यार्थ्यांना दिवसभर कार्यालयात अधिकाऱ्यांची वाट पाहावी लागते.अश्यात गोरगरीब नागरिकांची विद्यार्थ्यांची उपासमार होते. त्यामुळे केंद्रात लोकप्रतिनिधींना ज्याप्रमाणे माफक दरात कॅन्टीनची सोय केली जाते त्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात नागरिकांसाठी माफक दरात उपहारगृहाची निर्मिती करावी या मागणीचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने पुणे अप्पर जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना देण्यात आले.



## दिनांक ३० एप्रिल २०१८
## कार्याचा सन्मान

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे आणि रयत विद्यार्थी विचार मंच च्या कार्याची दखल घेत एकता मित्र मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला. सन्मान करताना सचिन भाऊ जगताप आणि पदाधिकारी





## दिनांक २२ मे २०१८

## रयत_विद्यार्थी विचार मंच कार्यकारणी बैठक

संस्थेची महत्वपूर्ण विषयावर बैठक झाली. या बैठकीत रयतचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, उपाध्यक्ष सनी पिसाळ,रोहीत कांबळे,शशिकांत कुंभार,नीरज भालेराव,हृषिकेश हेंद्रे,राज गराड उपस्थित होते,या वेळी धम्मराज साळवे यांनी महत्वाचे निर्णेय घेतले,व पुढील कामकाजाचे नियोजन केले.





## दिनांक ३१ मे २०१८

## पुण्यश्लोक,राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती

२९३ व्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी महासचिव संतोष शिंदे ,सचिव नीरज भालेराव पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे व पदाधिकारी उपस्थित होते..





दिनांक ४ जुन २०१८

## शालेय साहित्य वेळेत देण्याची मागणी

पिंपरी : महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दिरंगाई न करता रेनकोट व शालेय साहित्याचे वाटप करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाने केली आहे. मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी तशा आशयाचे निवेदन पालिका शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहे. पालिकेच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी हे गरजू व मध्यमवर्गीय कुटुंबातील असतात. पावसाळ्याच्या दिवसांत मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांना रेनकोट देण्यात यावे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Jun 05, 2018
Powered by: erelego.com

दिनांक ०५ जून २०१८



Pimpri : महापालिका शाळेत पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके

Published in

PRINT | EMAIL

प्रभारी प्रशासन अधिकारी पराग मुंढे यांची माहिती

एमपीसी न्यूज - पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण विभागाने बालभारतीकडून मागविलेली (पहिलीची वगळता) सर्व शालेय पाठ्यपुस्तके दाखल झाली. समग्र शिक्षा अभियानांतर्गत 20 केंद्रावरून ती वितरित करण्यात येतील. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांकडे पाठ्यपुस्तके असतील, असे शिक्षण विभागाचे प्रभारी प्रशासन अधिकारी पराग मुंढे यांनी सांगितले.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित व खासगी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. यासाठी 2018-19 या शैक्षणिक वर्षातील महापालिका शिक्षण विभागाने बालभारतीकडे सहा लाख दोन हजार 596 पुस्तकांची मागणी केली होती. त्यानुसार बालभारतीने पुस्तकांची छपाई केली. शिक्षण विभागाच्या एकूण मागणीपैकी 86 टक्के पुस्तके महापालिकेच्या पिंपरी आणि आकुर्डीच्या शहर साधन केंद्रावर दाखल झाली आहेत.

"यावर्षी पहिली, आठवी आणि दहावीचा अभ्यासक्रम बदललेला आहे. त्यानुसार आठवीची नवीन पुस्तके छापली असून सर्व माध्यमांची आठवीची पुस्तके दाखल झाली आहेत. दहावीचीदेखील पुस्तके उपलब्ध आहेत. मात्र, बदललेल्या अभ्यासक्रमापैकी इयत्ता पहिलीची पुस्तके अद्याप केंद्रावर दाखल झालेली नाहीत. पहिलीची ३७ हजार ६४० पुस्तके १५ जूनपर्यंत मिळण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

'विद्यार्थ्यांना वेळेत शालेय साहित्य मिळावे'

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वेळेत रेनकोट व शालेय साहित्य मिळावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केली आहे. याबाबत प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महापालिकेच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. काही दिवसांतच शाळा सुरु होतील. पावसाळ्याचे दिवस असल्याने विद्यार्थ्यांना वेळेत रेनकोट मिळावेत. शाळा सुरु होऊन महिना होऊन गेला तरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळत नाही. यंदा असे न होता विद्यार्थ्यांना रेनकोट आणि शालेय साहित्य वेळेत मिळावे, अशी मागणी केली आहे.



# रयत विद्यार्थी विचार मंच च्या मागणीला यश

# विदर्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तके व शालेय साहित्य मिळणार.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी चालवलेला मंच

**रयत विद्यार्थी विचार मंच** (महाराष्ट्र राज्य)

❋ संस्थापक/अध्यक्ष : **धम्मराज साळवे** (मो.: ८०८७५४०३८४)

दिनांक १० जून २०१८



## दिनांक १६ जुन २०१८
## संस्थेला आर्थिक सहाय्य

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विद्यमान नगरसेविका मा.निकिता कदम यांना वाढदिवसानिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतीय संविधानाची प्रत देऊन शुभेच्छा देताना संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व उपाध्यक्ष संदेश पिसाळ व सर्व पदाधिकारी यांनी यावेळी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याला प्रभावित होऊन नगरसेविका निकिता कदम यांनी संस्थेला आर्थिक सहाय्य केले..





















## दिनांक ३० जुन २०१८

## दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक पिंपरी चिंचवड पोलीस उपायुक्त गणेश शिंदे सर प्रमुख उपस्थिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर मा.नितीन काळजे उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना तुळशीचे रोप व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर व संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

लोकमत

# गुणवंतांचा पिंपरीत सत्कार

## उपक्रम : विद्यार्थ्यांना तुळशी रोपांचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क



सत्कार : प्रतीक्षा शिंदेचा सत्कार करताना नितीन काळजे, धम्मराज साळवे, मेघा आठवले.

**पिंपरी** : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. नारायण मेघाजी लोखंडे कामगार भवनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रक, सन्मानचिन्ह, तुळशीचे रोप या वेळी प्रदान करून सन्मान करण्यात आला.

रयत विद्यार्थी मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अंजना गायकवाड कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा होत्या. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, महापौर नितीन काळजे, संदेश पिसाळ, शशिकांत कुंभार, संतोष शिंदे, नीरज भालेराव, मेघा आठवले, रोहित कांबळे, आनंद विजापुरे, समाधान गायकवाड, कोमल बोर्डे आदी या वेळी उपस्थित होते.

प्रतीक्षा शिंदे या विद्यार्थिनीचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. प्रतीक्षाच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तिच्या आईच्या मेंदूची दोन वेळा शस्त्रक्रिया झाली होती. अपघातात पायाला दुखापत झाल्याने वडिलांना अपंगत्व आले. तरीही अशा परिस्थितीत प्रतीक्षाने दहावीच्या परीक्षेत ९२.२० टक्के गुण मिळविले. निकालापूर्वीच तिच्या वडिलांचे निधन झाले.

उपायुक्त शिंदे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी प्रत्येक संकटावर मात केली पाहिजे. स्पर्धा परीक्षा, उद्योग या क्षेत्राकडे वळले पाहिजे. सोशल मीडियाचा अतिवापर टाळला पाहिजे."

अंजना गायकवाड यांनी स्वागत केले. संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Jul 02, 2018
Powered by: erelego.com



01 Jul 2018

## Pimpri : दहावी बारावीतील विद्यार्थ्यांचा पोलीस उपायुक्तांच्या हस्ते सत्कार

LEENA MANE | ठळक बातम्या

**एमपीसी न्यूज - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने कै.नारायण मेघाजी लोखंडे कामगार भवन येथे १०वी १२वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. पिंपरी येथे झालेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सन्माननीय पोलीस उपायुक्त गणेश शिंदे तसेच प्रमुख पाहुणे महापौर नितीन काळजे, कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे , अंजना गायकवाड आदी उपस्थित होते.**

यावेळी गुणवंत विद्यार्थीनी म्हणून प्रतीक्षा सौदागर शिंदे हीचा पोलीस उपायुक्त गणेश शिंदे तसेच महापौर नितीन अप्पा काळजे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपायुक्त गणेश शिंदे सर कार्यक्रमाचे अध्यक्ष्य धम्मराज साळवे सर स्वागताध्यक्ष अंजना गायकवाड व रयत विद्यार्थी विचार मंच पदाधिकाऱ्यांच्या हस्ते ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रक,सन्मानचिन्ह,तुळशीचे रोप देऊन सन्मान करण्यात आला.



**दिनांक ०१ जुलै २०१८**

**संस्थेला आर्थिक सहाय्य**

**अपना वतन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सिद्धीक भाई शेख, नेते अकिल सय्यद यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला पुढील कार्यासाठी सहाय्य निधी धनादेश दिला.**



**दिनांक १० जुलै २०१८**
**सर्व विद्यार्थ्यांना पालिकेकडून तात्काळ रेनकोट मिळावे**

सध्या पावसाचे प्रमाण खूप आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी खूप गैरसोय होते म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पालिकेकडून तात्काळ रेनकोट मिळावे यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मा.शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.निवेदन देताना शहराध्यक्ष रोहित कांबळे, उपाध्यक्ष महेश गायकवाड, व शहरसचिव आनंद विजापूरे उपस्थित होते.

दिनांक ११ जुलै २०१८



लोकमत

महत्त्वाचे

**विद्यार्थ्यांना रेनकोट देण्याची मागणी**

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचने पालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांना रेनकोट देण्याची मागणी केली आहे. तशा आशयाचे निवेदन पालिका शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. पालिकेच्या शाळेत शिकणारी मुले ही अत्यंत गरीब कुटुंबातील असतात. सध्या पावसाचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. रेनकोट अथवा छत्री नसल्याने ही मुले भिजतच शाळेत जातात. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी त्यांना त्वरित रेनकोट देण्याची मागणी मंचाचे शहराध्यक्ष रोहित कांबळे यांनी केली आहे.





**दिनांक १८ जुलै २०१८**

**पोलीस अधिकारी  पूजा पारखी यांची ग्रेट भेट**

पोलीस वर्दीतील सुप्रसिद्ध गायिका ,ज्यांनी आपल्या आवाजाने लाखो मनावर अधिराज्य गाजवलं अश्या पोलीस अधिकारी  पूजा पारखी यांची भेट झाली. यावेळी त्यांच्या कलेविषयी व गायना विषयी चर्चा झाली. यावेळी त्यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट दिली.



दिनांक १८ जुलै २०१८

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व नेल्सन मंडेला यांना अभिवादन**

## पिंपरीत नेल्सन मंडेला, लोकशाहिरांना अभिवादन

**पिंपरी, दि. १९ (प्रतिनिधी) -** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे नेल्सन मंडेला यांची जयंतीनिमित्त व अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त पिंपरी येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, रोहित कांबळे, नीरज भालेराव, सनी पिसाळ, मेघा आठवले, कोमल बोर्डे, शशिकांत कुंभार, महेश गायकवाड, आनंद विजापुरे, समाधान गायकवाड, ऋषिकेश हेंद्रे, अतुल वाघमारे उपस्थित होते.

दिनांक १९ जुलै २०१८

**पुढारी**

## अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**पिंपरी : प्रतिनिधी**

रयत विद्यार्थी मंचच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी रयत विद्यार्थी मंचचे संस्थापक धम्मराज साळवे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, रोहित कांबळे, नीरज भालेराव, सनी पिसाळ, मेघा आठवले, कोमल बोर्डे शशिकांत कुंभार, महेश गायकवाड, आंनद विजापूरे, समाधान गायकवाड ऋषिकेश हेंद्रे, अतुल वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी धम्मराज साळवे, अंजना गायकवाड यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती दिली. संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

My Pimpri Edition
20 July, 2018 Page No.
Powered by :

**लोकमत**

## अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने नेल्सन मंडेला यांच्या जयंतीनिमित्त व अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. संघाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, रोहित कांबळे, नीरज भालेराव, सनी पिसाळ, मेघा आठवले, कोमल बोर्डे, शशिकांत कुंभार, महेश गायकवाड, आंनद विजापूरे, समाधान गायकवाड ऋषिकेश हेंद्रे, अतुल वाघमारे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

धम्मराज साळवे म्हणाले, "युवकांमध्ये नेल्सन मंडेला यांच्यासारखी निर्भीडता, सत्यता, ध्येयवाद आणि सर्वस्व झोकून देण्याची सिद्धता असली पाहिजे तरच आपण यशस्वी होऊ शकतो." संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 2 Jul 20, 2018
Powered by: erelego.com

**mpc news.in**



19 Jul 2018

## Pimpri : रयत विद्यार्थी विचार मंचच्यावतीने नेल्सन मंडेला व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

LEENA MANE | FONT SIZE
अन्य बातम्या | Published in अन्य बातम्या
PRINT | EMAIL |
RATE THIS ITEM (0 votes)

**एमपीसी न्यूज - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने नेल्सन मंडेला व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. नेल्सन मंडेला आपले संपूर्ण जीवन डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या विचारधारेवर व्यतीत केले. नेल्सन मंडेला हे दक्षिण आफ्रिकेचे पहिले राष्ट्रपती होते. रक्ताचा एक थेंब हि न सांडता दक्षिण आफ्रिकेत त्यांनी क्रांती घडून आणली. काळे आणि गोरे अश्या वर्णभेदाला मूठमाती देऊन अहिंसेच्या मार्गाने मूठमाती देऊन कृष्णवर्णीयांच्या अंधारमय जीवनात त्यांनी प्रकाश आणला. सुमारे ३ शतकांच्या वर्ण वर्चस्वानंतर दक्षिणआफ्रिकेस लोकशाही राष्ट्र बनविण्याचे श्रेय त्यांना जाते.**

तसेच अण्णाभाऊ साठे हे एक थोर समाजसुधारक लोककवी आणि लेखक होते. अण्णाभाऊ साठे हे केवळ दीड दिवस शाळा शिकले तरी त्यांनी 35 कादंबऱ्या,15 लघुकथा, 13 लोकनाट्य, 3 नाटके,13 कथासंग्रह , 1 शाहिरी पुस्तक, 15 पोवाडे, 1 प्रवास वर्णन आदी विपुल प्रमाणात त्यांनी लेखन करून समाजपरिवर्तनाचं काम केले.

संस्थापक अध्यक्ष साळवे,.यावेळी रोहित कांबळे,नीरज भालेराव ,सनी पिसाळ,मेघा आठवले,कोमल बोर्डे शशिकांत कुंभार, महेश गायकवाड,आंनद विजापूरे,समाधानगायकवाड ऋषिकेश हेंद्रे अतुल वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महासचिव संतोष शिंदे यांनी केले .

दिनांक २० जुलै २०१८






## दिनांक १८ जुलै २०१८

## उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मागण्या करिता आयुक्तांची आंदोलकांसोबत चर्चा

पिंपरी चिंचवड मुस्लिम विकास परिषद व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मागण्या करिता अब्दुल रोफ कुरेशी व रयत विध्यार्थी मंचाच्या कार्याध्यक्ष अंजना गायकवाड बेमुदत उपोषणाला बसले होते.

रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने मा. आयुक्त यांच्यासोबत बैठक झाली व या उपोषणाची दखल घेत आयुक्त ,अतिरिक्त आयुक्त तसेच शिक्षण अधिकारी यांनी मागण्या मान्य केल्या व उपोषण तात्काळ मागे घेण्यात आले..या वेळी अकिल मुजावर,धम्मराज साळवे,समीर मासुळकर व सर्व शिष्टमंडळ उपस्थित होते.

पुढारी



उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घेण्यासाठी लेखी आश्वासन देताना पराग मुंडे आणि अब्दुल रौफ कुरेशी, अंजना गायकवाड आदी.

# उर्दू शाळा समस्या प्रश्नीचे उपोषण मागे

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा संदर्भातील विविध मागण्यांसाठी पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी बेमुदत उपोषण करण्यात आले होते. महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व मागण्या मान्य करीत लवकरच योग्य निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर पिंपरी- चिंचवड मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने सुरू असलेले उपोषण मागे घेण्यात आले.

उपोषणाच्या वेळी माध्यमिक विभागातील थेरगाव, दापोडी, खराळवाडी, नेहरूनगर, लांडेवाडी व रुपीनगर तीन वर्षापासून पुरेसे शिक्षक उपलब्ध करून देण्यात आलेले द्यावेत. सहा शाळांना अद्यापपर्यंत पुरेशा वर्ग खोल्या व इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

माध्यमिक शिक्षकांच्या मानधनात वाढ व्हावी. उर्दू शाळांसाठी उर्दू माध्यमांचे मुख्याध्यापक असावेत. तसेच प्राथमिक विभागासाठी महापालिका शिक्षण मंडळाच्या सर्वच उर्दू प्राथमिक शाळा आरटीई अन्वये इयत्ता आठवीपर्यंत करण्यात याव्यात. मुख्याध्यापकाची जवळपास ४३ पदे रिक्त आहेत, ती भरली जावीत. सर्वच उर्दू प्राथमिक विद्यालयांमध्ये सेमी इंग्रजी सुरू करण्यात यावे. सध्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना सेमी इंग्रजी करिता आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. सर्वच प्राथमिक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची पदे भरण्यात यावीत, यासह विविध मागण्या करण्यात आल्या होत्या.

मुस्लिम विकास परिषद यांच्या वतीने उपाध्यक्ष अब्दुल कुरेशी आणि रयत विद्यार्थी विचार मंचच्या कार्याध्यक्षा अंजना गायकवाड हे उपोषणकर्ते होते. विषयाची गंभीरता जाणून सत्तारूढ पक्षनेते एकनाथ पवार, नगरसेवक समीर मासुळकर यांनी उपोषणाची दखल घेत आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त प्रवीण आष्टीकर, शिक्षण अधिकारी ज्योत्स्ना शिंदे यांनी चर्चा करून सर्व मागण्या मान्य करत योग्य निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. लेखी आश्वासन पत्र माध्यमिक विभाग अधिकारी पराग मुंडे यांनी दिले नगरसेवक मासुळकर यांच्या हस्ते ज्यूस घेऊन उपोषण सोडले.

Pimpri Edition
19 July, 2018 Page No. 2
Powered by : erelego.com

दिनांक १९ जुलै २०१८



**दिनांक २१ जुलै २०१८**

**राष्ट्रीय युवा चेतना पुरस्कार**

काव्य मित्र संस्थेच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय युवा चेतना या पुरस्काराने संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना सन्मानित करताना काव्य मित्र संस्थेचे पदाधिकारी



दिनांक ०१ ऑगस्ट २०१८

लोकशाहीर अण्णाभाऊ यांना जयंतीनिम्मित अभिवादन

PCB

**पिंपरी, दि. १ (पीसीबी) – रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व उपाध्यक्ष संदेश पिसाळ यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

धम्मराज साळवे म्हणाले, "अण्णाभाऊ यांनी ज्याप्रमाणे अतिशय हलाखीच्या परिस्थितीवर मात करुन संपूर्ण विश्वात आपल्या लेखणीच्या माध्यमातून साहित्यक्षेत्रात आपला ठसा उमटवला. त्याप्रमाणे आजच्या विद्यार्थ्यांनीही हलाखीची परिस्थिती यशाच्या कधीही आडवी येत नाही हे लक्षात ठेवावे. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशाचे शिखर गाठावे."

महासचिव संतोष शिंदे यांनी अण्णाभाऊंच्या जीवनावर मार्गदर्शन केले. यावेळी कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, सचिव निरज भालेराव, शहराध्यक्ष रोहित कांबळे, सहसचिव समाधान गायकवाड, शहरसचिव आनंद विजापुरे, उपाध्यक्ष महेश गायकवाड, सदस्य निखिल मुरकुटे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा आठवले यांनी केले.

# लोकमान्य टिळक, अण्णा भाऊंना अभिवादन



पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या निगडीतील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर दुसऱ्या छायाचित्रात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त त्यांच्या निगडी भक्ती-शक्ती येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

। पिंपरी : प्रतिनिधी

लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात विविध उपक्रम राबविण्यात आले. विविध संस्था, संघटना तसेच राजकीय पक्षांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

## पिंपरी चिंचवड महापालिका

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या निगडी येथिल पुतळ्यास महापालिकेच्या वतीने स्थायी समिती सभापती ममता गायकवाड, सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार व विरोधी पक्षनेते दत्तात्रय साने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अ प्रभाग अध्यक्षा अनुराधा गोरखे, फ प्रभाग अध्यक्षा कमल घोलप, मनसे गटनेता सचिन चिखले, अतिरिक्त आयुक्त दिलीप गावडे, नगरसेवक सुमन पवळे, शर्मिला बाबर, उत्तम केंदळे, सहाय्यक आयुक्त आशादेवी दुरगुडे, मनोज लोणकर, अण्णा बोदडे, नगरसचिव उल्हास जगताप, प्रशासन अधिकारी प्रभावती गाडेकर, रामकिसन लटपटे, अरुण जोगदंड आदी उपस्थित होते.

## रयत विद्यार्थी मंच

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थापक-अध्यक्ष व उपाध्यक्ष संदेश पिसाळ यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष धम्मराज साळवे, अंजना गायकवाड, निरज भालेराव, शहराध्यक्ष रोहित कांबळे, समाधान गायकवाड, आनंद विजापूरे, महेश गायकवाड, निखिल मुरकुटे उपस्थित होते.

## 'भारतीय जनता युवा मोर्चा

भाजप युवा मोर्चाच्या वतीने नगरसेवक रवी लांडगे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्रदेश युवा मोर्चाचे प्रदेश चिटणीस अनुप मोरे, प्रभाग समिती स्विकृत सदस्य वैशाली खाडये, भाजयुमोर्चाचे अजित कुलथे, दीपक नागरगोजे, युवराज लांडे, प्रविण सिंग, मधुकर बच्चे, राहुल शिंदे, मंगेश धाडगे, भूषण नायके, पंकज वेंगुर्लेकर, गणेश संभेराव, पवन जाधव, भागवत मुंडे, राजेश राजपुरोहित, प्रदिप पटेल, अमित देशमुख, सचिन बंदी, ओंकार मोरे, अनिल सौंदळे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती पिंपरी येथील पक्ष कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी साठे यांच्या प्रतिमेचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे-पाटील यांनी पूजन केले. वैशाली काळभोर, फजल शेख, आनंदा यादव, विनोद कांबळे, सचिन माने, संजय औसरमल, मनिषा गटकळ, इम्रान शेख, बाळासाहेब पिल्लेवार, मनिष शेडगे, गणेश पुंडे, संदीप पाटील, मनोहर भोसले, प्रशांत कडलग, शशिकांत निकाळजे, सविता धुमाळ, उल्हास चंदनशिवे, सुनील अडागळे आदी उपस्थित होते.

## शिवसेना पिंपरी-चिंचवड

शिवसेनेच्या वतीने आमदार गौतम चाबुकस्वार व शहर संघटिका सुलभा उबाळे यांच्या हस्ते टिळक व साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या वेळी भारतीय कामगार सेनेचे उपाध्यक्ष इरफान सय्यद, अण्णाभाऊ साठे समितीचे अध्यक्ष अरुण जोगदंड, विनायक रणसुंभे, शिवसेना पिंपरी विधानसभा संघटक रोमी संधू, उपशहर प्रमुख अमोल निकम, शहर कार्यालय सचिव ज्ञानेश्वर शिंदे, उपविभाग प्रमुख महेश जाधव, एक्ससाईट बॅटरी युनियन प्रतिनिधी दिलीप भोंडवे, संदेश भूमकर, शिवाजी पाटील, युवासेना निखिल पांढरकर, उपविभाग अधिकारी केदार चासकर, लक्ष्मण माणकेधरे, रोहित सोनवणे, विनोद बच्छाव, जगदीश पाटील आदी उपस्थित होते.

## रिपांइ (गवई गट)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निगडी येथील त्यांच्या पुतळ्यास रिपांइचे (गवई गट) शहराध्यक्ष बबन साके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महिलाध्यक्षा रेश्मा पारधे, विजय दणके, रमेश शिंदे, विजय भोसले, बापू केदारी, विकास चव्हाण, दैवशाला कांबळे, संदीप मोरे, दीपक लोखंडे, राजू धुरंधरे, प्रदीप कांबळे आदी उपस्थित होते.

## रिपब्लिकन एम्प्लाइज फेडरेशन

रिपब्लिकन एम्प्लाईज फेडरेशनच्या वतीने निगडी येथील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष विनोद चांदमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या वेळी भीमराव नाडे, सम्राट जकाते, विलास गरड, लक्ष्मण मुदळे, वैजनाथ मुंडे, शेषेराव सूर्यवंशी, नारायण वानखेडे, बाबासाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्रबोधन पर्व

महापालिकेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार उपक्रमाअंतर्गत १ ते ५ ऑगस्ट या कालावधीत प्रबोधनपर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन निगडीतील स्मारकाजवळ बुधवारी (दि.१) झाले. तसेच, पाच दिवसात विविध प्रबोधनपर व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले आहे.







**दिनांक ०१ ऑगस्ट २०१८**
**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या**
**जयंतीनिमित्त वृक्षारोपण**

संघर्ष बुद्धविहार आयोजित साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण आणि मार्गदर्शन पर कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे समवेत वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे सर,नगरसेविका कमल घोलप, कार्यध्यक्ष अंजना गायकवाड,आयोजक अक्षय कसबे, रमेश सरोदे











**दिनांक ५ ऑगस्ट २०१८**

**संस्थेच्या कार्यालयाचे उदघाटन**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) संस्थेच्या कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले,या वेळी प्रमुख पाहुणे पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील यांच्या हस्ते कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले,तसेच सहायक पोलिस आयुक्त सतीश पाटील,गुन्हे शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक उंडे साहेब,पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल बडे सर तसेच व अन्य अधिकारी उपस्थित होते.

पुढारी



रयत विद्यार्थी विचार मंच कार्यालयाचे उद्घाटन सहाय्यक पोलिस आयुक्त सतीश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# रयत विद्यार्थी विचार मंचच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पिंपरी : प्रतिनिधी**

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सहाय्यक पोलिस आयुक्त सतीश पाटील व पोलिस उपनिरीक्षक सागर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पोलिस दलातील गुन्हे शाखा वरिष्ठ पोलिस निरीक्षक उंडे, पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल बडे, संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, सहसचिव मेघा आठवले, सचिव नीरज भालेराव, उपाध्यक्ष शशिकांत कुंभार आदी उपस्थित होते.

यावेळी सतीश पाटील व सागर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संदेश पिसाळ यांनी सूत्रसंचालन केले.

My Pimpri Edition
7 Aug, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक ०७ ऑगस्ट २०१८



दिनांक ११ ऑगस्ट २०१८

दिल्ली येथे भारतीय संविधानाची प्रत जळल्याप्रकरणी व भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी अपशब्द वापरून घोषणा दिल्याबाबद्दल या कुप्रवृत्तीवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करून यांना कडक शासन करण्यात यावे यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य च्या वतीने पिंपरी पोलीस स्टेशन येथे मा.पोलीस वरिष्ठ निरीक्षक विठ्ठल कुबडे सर व ACP सतीश पाटील सर यांना निवेदन देण्यात आले.

दिनांक १२ ऑगस्ट २०१८



**रयत विद्यार्थी परिषद**

भारतीय संविधान जाळणाऱ्या कुप्रवृत्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी रयत विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्यासह कार्यकर्त्यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे केली आहे.



महात्मा फुले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधान प्रस्ताविकचे वाटप करण्यात आले. या वेळी धम्मराज साळवे व इतर.

# संविधान जागृतीतून देशाचे भविष्य उज्ज्वल : धम्मराज साळवे

**पिंपरी :** भारतीय संविधान देशासाठी व देशातील प्रत्येक नागरिकांसाठी महत्वाचे आहे. तरुणांना न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जाणीव करून देणे गरजेचे आहे. संविधान प्रत्येक युवकांना समजले पाहिजे. तरच देशाचं भविष्य उज्वल असल्याचे प्रतिपादन धम्मराज साळवे यांनी केले. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महात्मा फुले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधान प्रस्ताविकेचे वाटप करण्यात आले. संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते संविधान प्रस्ताविकेचे वाटप करण्यात आले. या वेळी साळवे बोलत होते. महासचिव संतोष शिंदे, सचिव निरज भालेराव, शहराध्यक्ष रोहित कांबळे, विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश तुरुकमारे, आशिष प्रधान, ऋषी तुरुकमारे, सागर भाकरे, पवन तुरुकमारे, भावेश कांबळे, शुभम तुरुकमारे आदी पदाधीकारी या वेळी उपस्थित होते. साळवे म्हणाले की, भारत देश हा भारतीय संविधानावर चालतो. अनेक जाती, पंत, धर्म असलेला हा देश आज ७० वर्ष व्यवस्थित सक्षमपणे चालत आहे. याला एकमेव कारण म्हणजे भारतीय संविधान आहे.

My Pimpri Edition
14 Aug, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक १५ ऑगस्ट २०१८




दिनांक १४ ऑगस्ट २०१८

रयत विद्यार्थी विचार मंच तर्फे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा....



पुढारी

## रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे स्वातंत्र्यदिन उत्साहात

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने स्वातंत्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या कार्याध्यक्षा अंजना गायकवाड व संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. राष्ट्रगीत घेऊन राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. तसेच भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी धम्मराज साळवे म्हणाले की, आपल्याला स्वातंत्र्य मिळाले खरे पण या स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्याचें काम खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने केले आहे.

त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच वाचन व अभ्यास करणे गरजेचे आहे. व संविधानाचे पालन करून एक आदर्श देश व नागरिक घडवण्यासाठी कार्यशील राहिले पाहिजे.

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडावंदन करून संविधान प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले.

My Pimpri Edition
17 Aug, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

# उद्योगनगरीत स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा



। पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध राजकीय पक्षांसह शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांच्या वतीने देशाचा ७२ वा स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

## महापालिकेच्या प्रांगणात ध्वजारोहण

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात महापौर राहुल जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, उपमहापौर सचिन चिंचवडे, सत्तारूढ पक्षनेते एकनाथ पवार, आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसेवक कैलास बारणे, अनुराधा गोरखे, भीमाबाई फुगे, राजेंद्र गावडे, राजू मिसाळ, अमित गावडे, केशव घोळवे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या खराळवाडी येथील पक्ष कार्यालयासमोर शहराध्यक्ष संजोग वाघेरे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. त्यानंतर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

महिला शहराध्यक्षा वैशाली काळभोर, नगरसेविका वैशाली घोडेकर, गिता मंचरकर, अनुराधा गोफणे, अपर्णा डोके, महंम्मद पानसरे, विश्रांती पाडाळे, आनंदा यादव, ज्ञानेश्वर कांबळे, शकुंतला साठे, सुनिल गव्हाणे, विनोद कांबळे, सिधुताई पांढारकर, प्रदीप गायकवाड, कविता खराडे आदींसह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कॉंग्रेस पर्यावरण विभाग

पिंपरी चिंचवड कॉंग्रेस पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष अशोक मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यानंतर देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. मोशी येथे आयोजित कार्यक्रमास अशोक मंगल, दिलीपसिंग मोहिते, राजन पिल्ले, अमर नाणेकर, आयुष मंगल, अशोक काळभोर, नेहा मंगल, राधा नावर आदी उपस्थित होते.

## समाजवादी पार्टी

समाजवादी पक्षाच्या कार्यालयासमोर शहराध्यक्ष रफिक शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. रतन सोनकर, सालार शेख, प्रा. नरेंद्र पवार, रवीभान यादव, हेसामोद्दीन अन्सारी, रामरूप यादव, साजीद शेख, जावेद शहा, रवींद्र यादव, वहिदा शेख, वैशाली कसबे, मनोज यादव, मोहसीन शेख, श्यमा कसबे, राहुल जाधव आदी उपस्थित होते.

## रयत विद्यार्थी विचार मंच

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थेच्या कार्याध्यक्षा अंजना गायकवाड व संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संतोष शिंदे, भाग्यश्री आखाडे, संदेश पिसाळ, नीरज भालेराव, मेघा आठवले, शशिकांत कुंभार, रोहित कांबळे, महेश गायकवाड, आनंद विजापूरे, समाधान गायकवाड, ऋषिकेश हेंद्रे, रेश्मा इनकर, प्रीतम वाघमारे, महेश सोनवणे, निखिल मुरकुटे आदी उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ पिपरी टाऊन

रोटरी क्लब ऑफ पिपरी टाऊनच्या रोट्रॅक्ट क्लब ऑफ मॉडर्न महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्यदिनी आयोजित रक्तदान शिबिरात ५० जणांनी रक्तदान केले. निगडीतील यमुनानगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात बुधवारी (दि.१५) झालेल्या या शिबिराला मॉडर्नचे सचिव शरद इनामदार, प्राचार्य सदाशिव शिरगावे, सदाशिव काळे, महादेव शेंडकर, गीता जोशी, आनंद सूर्यवंशी, दीनानाथ जोशी, रश्मी भावे, रवींद्र भावे, प्रदीप वाल्हेकर, स्वाती वाल्हेकर, बाळकृष्ण उऱ्हे, मंदाकिनी भोसले आदी उपस्थित होते.

5/16

## पिंपरीत संविधान प्रास्ताविकेचे वाचन

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थेच्या पिंपरी येथे कार्याध्यक्षा अंजना गायकवाड व संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. महासचिव संतोष शिंदे, सहसचिव भाग्यश्री आखाडे यांनी मनोगत व्यक्त केले. खजिनदार संदेश पिसाळ, सचिव नीरज भालेराव, सहसचिव मेघा आठवले, उपाध्यक्ष शशिकांत कुंभार, रोहीत कांबळे, महेश गायकवाड, आनंद विजापुरे, समाधान गायकवाड, ऋषिकेश हेंद्रे, रेश्मा इनकर, प्रितम वाघमारे, महेश सोनवणे, निखिल मुरकुटे आदी उपस्थित होते.

दिनांक १५ ऑगस्ट २०१८

पुढारी

# राज्यघटना जाळणे देशद्रोहच

## कांबळे यांची टीका

**पिंपरी : प्रतिनिधी**

आरक्षण धोरणाला विरोध करत दिल्लीत एका संघटनेने राज्यघटनेची प्रत जाळली होती. राज्यघटना कोणा एका धर्माची अथवा समूहाची नाही. ती भारतातील सर्व नागरिकांची आहे. ज्या अर्थी भारतीय राज्यघटना जाळली गेली, त्या अर्थी या व्यक्तींना, संघटनेला भारतीय स्वातंत्र्य, कायदे मान्य नाहीत. घटना जाळणे म्हणजे देशद्रोह असल्याचे प्रतिपादन मानव कांबळे यांनी केले.



**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक, निगडी भक्ती-शक्ती चौक येथे घटना जाळल्याबद्दल निषेध सभेचे आयोजन करण्यात आले.**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक, निगडी भक्ती-शक्ती चौक येथे घटना जाळल्याबद्दल निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. या वेळी मानव कांबळे बोलत होते. या वेळी संबंधितांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी निगडी पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र जाधव यांना निवेदनाद्वारे केली.

सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत आरवाड, बहुजन प्रतिष्ठानचे विजय साळवे, अमित भालेराव आदींसह सामाजिक कार्यकर्ते शिवाजी साळवे, किशोर हातागळे, अरूण जोगदंड, बाळासाहेब वरगले, हौसराव शिंदे, बापूसाहेब गायकवाड, प्रबुद्ध कांबळे आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

या वेळी धम्मराज साळवे म्हणाले की, राज्यघटना हा तुमच्या मूलभूत हक्कांचा, धार्मिक, वैचारिक, न्याय, समता आणि स्वातंत्र्याचा करार आहे. राज्यघटनेचे संरक्षण करणे आपल्या प्रत्येकासाठी आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पूर्वी केलेल्या भाषणाचे पुन्हा स्मरण होणे गरजेचे आहे. देश सर्वोच्च मानून जबाबदारी पार पाडणे हे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे.

सर्वजीत बनसोडे म्हणाले की, आझाद सेनेला 'आझाद' या शब्दाचा अर्थ कळला असता, तर त्यांनी हा अक्षम्य अपराध केला नसता. राज्यघटनेमुळेच प्रत्येक व्यक्ती मुक्त आणि स्वतंत्र श्वास घेते. प्रत्येकाला शासनाचा निषेध आणि विरोध करण्याचा अधिकार दिला; मात्र हा निषेध सविनय, अहिंसक आणि कायदेशीर असावा.

सतीश कदम म्हणाले की, राज्यघटना जाळण्यापेक्षा ती एकदा वाचणे गरजेचे होते. घटनेमुळे सर्वांना जगण्यासाठीचे स्वातंत्र्य दिले. ती वाचल्यामुळे डोक्यातले वाईट विचार जळून खाक होतील.

My Pimpri Edition
19 Aug. 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

दिनांक १९ ऑगस्ट २०१८



**दिनांक २३ ऑगस्ट २०१८**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत शाळांमध्ये ८ वी ते १० वी पर्यंत सेमी इंग्लिश माध्यमातून शिक्षण दिले जावे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत शाळांमध्ये ८ वी ते १० वी पर्यंत सेमी इंग्लिश माध्यमातून शिक्षण दिले जावे व याच शैक्षणिक वर्षात सुरुवात करावी या संदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष-धम्मराज साळवे शिक्षण मंडळ सभापती प्रा.सोनाली गव्हाणे यांना निवेदन देताना.









## दिनांक २४ ऑगस्ट २०१८

## केरळ पूरग्रस्तांना रयतचा मदतीचा हात

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने केरळ येथील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील महाविद्यालयात जाऊन विद्यार्थी तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी नागरिकांकडून निधी संकलन करण्यात आले.नागरिक व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद देऊन सढळ हाताने मदत केली. ₹६१९० रुपये निधी जमा झाला.







**दिनांक २५ ऑगस्ट २०१८**

**इतिहासकार ,प्रबोधनकार ,व्याख्याते श्रीमंत कोकाटे सर यांचा समवेत**


महत्वपूर्ण विषयावर तथा रयत विद्यार्थी विचार मंच ची संकल्पना यावर इतिहासकार ,प्रबोधनकार ,व्याख्याते श्रीमंत कोकाटे सर यांचा समवेत चर्चा करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे आणि महासचिव संतोष शिंदे, सचिव नीरज भालेराव आणि सहकारी



## दिनांक ०१ सप्टेंबर २०१८
## प्रिंटरची मदत

अनेक गरीब,गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक फॉर्म भरायचे असतात.बाहेर खूप पैसे घेतात त्यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अश्या गरीब,होतकरू विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्यात यावे यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याला प्रभावित होऊन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी साहेब यांनी संस्थेला  प्रिंटर भेट दिला त्याबाबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने खूप खूप आभार





## दिनांक ०३ सप्टेंबर २०१८

## विद्यार्थ्यांचा विमा महानगरपालिकेच्या वतीने काढण्यात यावा.

औद्योगिक पिंपरी चिंचवड शहरात गरीब,कष्टकरी घरातील गरजू विद्यार्थी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. अनेक वेळा दुर्घटना घडतात व विद्यार्थी अपघातात जखमी होतात अथवा मृत्यू पावतात. याकरिता महानगरपालिकेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे जीवन व आरोग्य विमा काढण्यात यावे यासाठी मागील ०६ महिण्यापासून संस्थेच्या वतीने पाठपुरावा केला जातोय आज परत एकदा आयुक्तांना समक्ष भेटून रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे आणि महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदन दिले.आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला..

पुढारी

# पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना विमा देण्याची मागणी

**पिंपरी :** पालिकेच्या शाळा रहदारीच्या ठिकाणी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अपघात घडण्याची शक्यता असते. प्रसंगी काही ठिकाणी विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागतो. यासाठी पलिकेतर्फे विद्यार्थ्यांचा विमा काढण्यात यावा, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केली आहे.

याबाबत आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पालिकेच्या शाळांमध्ये वंचित आणि झोपडपट्टी कुटुंबातीलच विद्यार्थी शिक्षण घेतात. एखाद्या विद्यार्थ्याचा अपघात घडला तर खाजगी रुग्णालयात उपचार घेणे हे पालकांना परवडत नाही. वाल्हेकरवाडी येथे एक विद्यार्थी गाडीच्या आडवे येऊन त्याचा अपघात झाला. तर निगडी येथे एका विद्यार्थ्याचा डीपीचा शॉक लागून मृत्यू झाला. अशा अनेक घटना वारंवार घडत आहेत. संस्थेच्या वतीने पालिकेकडे विद्यार्थ्यांचा विमा काढवा यासाठी पाठपुरावा केला जातोय. सरकार आमदारांचा विमा काढू शकते तर पालिका विद्यार्थ्यांचा विमा का काढू शकत नाही, असा सवाल त्यांनी केला आहे.

My Pimpri Edition
5 Sep, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com



**दिनांक ०३ सप्टेंबर २०१८**

**योद्धा प्रतिष्ठान दहीहंडी आयोजकांकडून संस्थेच्या कार्याचा सन्मान**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचा यथोचित सन्मान करत मा.युवा नेते संदीप ढेरंगे व मा.नगरसेवक शेखरभाऊ ओव्हाळ यांनी पिंपरी येथे भव्य दहीहंडी आयोजित केली असता संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व पदाधिकारी यांना सन्मान चिन्ह देऊन संस्थेच्या कार्याचा यथोचित सन्मान केला व दहा हजार रुपये संस्थेला आर्थिक मदत केली. यावेळी महासचिव संतोष शिंदे,सचिव नीरज भालेराव,शहरप्रमुख रोहित कांबळे, सदस्य महेश सोनवणे उपस्थित होते..





## दिनांक ३० सप्टेंबर २०१८
## संस्थेला शैक्षणिक साहित्याची मदत

पिंपरी येथील वैष्णवीच्या ०६ व्या वाढदिवसानिम्मित तिचे वडील बजरंग मांडलकर यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला शैक्षणिक साहित्य दिले.त्याबद्दल त्यांचे आभार. संस्थेच्या कार्याची जागृती होतेय आणि नागरिक अनावश्यक खर्च टाळून गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकाससाठी नागरिक स्वच्छेने येऊन संस्थेला शैक्षणिक मदत करत आहेत.



## दिनांक ०४ सप्टेंबर २०१८

### प्रतिक्षा सौदागर शिंदे या विद्यार्थिनीस संस्थेकडून ४ हजार रूपये शैक्षणिक मदत

प्रतीक्षा शिंदे ही अतिशय होतकरू व हुशार विद्यार्थिनी.आई वडील भाऊ आणि ती असे ४ लोकांचं कुटुंब उस्मानाबाद जिल्हात कळंब या ठिकाणी अतिशय गरीब परिस्थितीत राहायचे.वडील एका पायाने अपंग तरीही पेट्रोल पंपावर काम करून घराचा उदारनिर्वाह करायचे.मागच्या काही दिवसात प्रतिक्षाच्या आईचा अपघात झाला डोक्याला मार लागला. २ वेळा ऑपरेशन झालं.वडिलांनी व्याजाने ४ लाख रुपये काढुन उपचार केला.त्यातच प्रतीक्षाच १० वि चे वर्ष.प्रतिक्षाच्या वडिलाच एकच स्वप्न होत की माझ्या मुलीचा पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात ऍडमिशन व्हावं.प्रतिक्षांने घरची परिस्थिती बिकट असताना वडिलांच स्वप्न आणि घरची परिस्थिती लक्षात घेऊन ९२% मार्क मिळवून फर्ग्युसन महाविद्यालयाला ऍडमिशन मिळवुन वडिलांचं स्वप्न पूर्ण केलं देखील... पण हे पाहायला मात्र तिचे वडील या जगात राहिले नाहीत.प्रतीक्षा पास होण्याच्या अगोदरच तिचे वडील दिनांक २० मे २०१८ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन पावले..कुटुंबाचा पूर्ण आधारच ढासळला.त्यात तिने उसने पैसे घेऊन ऍडमिशन मिळवलं तिने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे शैक्षणिक मदतीसाठी १० हजार रुपये आर्थिक मदतीची मागणी केली होती.परंतु निधी अभावी तिला संस्थेकडून शैक्षणिक हातभार म्हणून ०४ हजार रूपये आर्थिक मदत करण्यात आली..







## दिनांक ०५ सप्टेंबर २०१८

## एक मदत केरळ पूरग्रस्तांसाठी


रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने "एक मदत केरळ पूरग्रस्तांसाठी"आवाहन करून नागरिक व विद्यार्थी यांच्याकडून निधी संकलित करण्यात आला होता त्या निधीतून आज जीवनावश्यक व आरोग्यविषयक वस्तूंची मदत पुणे स्टेशन येथून केरळ पूरग्रस्तांसाठी पाठवण्यात आली.मदत सुपूर्त करताना महासचिव संतोष शिंदे व सचिव निरज भालेराव...




## दिनांक ०८ सप्टेंबर २०१८

## दिव्यरत्न_जीवन_गौरव_पुरस्कार_जाहीर

आपल्या सर्वांच्या सहकार्याने व शुभेच्छामुळे ..शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या बेवारस रुग्णांना न्याय देणाऱ्या बुलढाणा येथील दिव्या_फौंडेशन यांच्या वतीने आपल्या रयत विद्यार्थी विचार मंचच्या कार्याचा व आमच्या सामाजिक बांधिलकी चा गौरव म्हणून संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे आणि कार्याध्यक्ष अंजना गायकवाड यांना दिव्यरत्न जीवन गौरव_पुरस्कारा करीता निवड झाल्या बाबत निवड पत्र देताना दिव्या फौंडेशन चे संस्थापक अध्यक्ष - अशोक काकडे सर




**दिव्या फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य, बुलडाणा**

रजि.नं.महा००००१९

**अशोक काकडे**

**(संस्थापक अध्यक्ष)**

संपर्क: , सेंट जोसेफ. स्कूलजवळ,बुलडाणा. मो.नं. ९२६०००८००२ Email-divyafoundetion@gmail.cor

दिनांक - ०८.०९.२०१८

**पुरस्कार निवड पत्र**

प्रति

१) मा.धम्मराज साळवे

संस्थापक अध्यक्ष, रयत विद्यार्थी विचार मंच

२) मा.अंजना गायकवाड

कार्याध्यक्षा, रयत विद्यार्थी विचार मंच

आपणास कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, **दिव्या फाऊंडेशन**, बुलढाणा या सामाजीक संस्थेच्या वतीने "**दिव्य रत्न जीवन गौरव**" पुरस्कारासाठी आपली निवड करण्यात आलेली असून आपण सहकुटूंब, सह परिवार या कार्यक्रमास उपस्थित रहावे. आपले दिव्या फाऊंडेशनच्यावतीने

हार्दिक अभिनंदन.

आपला

**कार्यक्रमाचे स्थळ**

गर्दे वाचनालय, बुलढाणा

दि.२१.१०.२०१८

वेळ - सकाळी ११.३० वाजता

श्री.अशोक काकडे

संस्थापक अध्यक्ष, दिव्या फाऊंडेशन,

महा. राज्य बुलढाणा

## दिनांक ०८ सप्टेंबर २०१८
## "दिव्यरत्न जीवन गौरव" पुरस्कार जाहीर

दिव्या फौंडेशन बुलढाणा सामाजिक संस्था यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना "दिव्य रत्न जीवन गौरव"पुरस्कार जाहीर







## दिनांक २१ सप्टेंबर २०१८

## विद्यार्थ्यांचा जीवन व आरोग्य विमा

विधानपरिषदेचे विद्यमान आमदार प्रा.जोगेंद्रजी कवाडे सर यांना महाराष्ट्रातील सर्व शासकीय शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा जीवन व आरोग्य विमा काढण्यासाठी विधानपरिषदेमध्ये प्रश्न मांडून तो मंजूर करून घ्यावा अश्या आशयाचे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले.सरांनी ही विषय छान आहे आणि लवकर मी तो विधानपरिषदेमध्ये मांडेल असे आश्वासन दिले. यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे महासचिव संतोष शिंदे,सचिव निरज भालेराव पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे उपस्थित होते...




दिनांक २२ सप्टेंबर २०१८

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी...





**दिनांक २३ सप्टेंबर २०१८**

**रयतच्या वतीने शिक्षक आंदोलनास पाठिंबा**

राज्यातील सर्व शिक्षक संघटनेच्या वतीने आज पुणे समाज कल्याण कार्यालयावर वेतनवाढ व अनेक विविध मागण्यासाठी ठिय्या आंदोलन केले होते.शिक्षकांच्या मागण्या कायदेशीर असल्यामुळे त्यास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते.




## दिनांक २६ सप्टेंबर २०१८
## रोहित शिंदे या विद्यार्थ्यास पुस्तकांची मदत

रोहित हा मेकॅनिकल आयटीआय चे पिंपरी येथे शिक्षण घेतो.त्याची घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे त्याने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे पुस्तकांची मागणी केली होती.त्याला संस्थेच्या वतीने पुस्तकांची मदत करण्यात आली..









## दिनांक  २७ सप्टेंबर २०१८
## MPSC UPSC संदर्भात मोफत मार्गदर्शन

ध्यास ग्रुप व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने  MPSC, UPSC संदर्भात मोफत  मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.कार्यक्राचे प्रमुख मार्गदर्शक शिवाजी अकॅडमीचे संस्थापक गणेश शेळके तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयरत्न  फडतरे होते. यावेळी गणेश शेळके सरांनी MPSC/UPSC संदर्भात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देताना येणार्या अडचणी व त्यावर कशी मात  करायची या संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सरांनी विद्यार्थ्यांनी MPSC/UPSC का करावी या संदर्भात मार्गदर्शन करताना अनेक महापुरुषांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांचं  मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला.

# रयत विद्यार्थी मंच, ध्यास ग्रुपतर्फे स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन

**पिंपरी –** रयत विद्यार्थी विचार मंच व ध्यास ग्रुपतर्फे स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन व चर्चासत्र घेण्यात आले. त्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी गणेश शेळके यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी कशी करायची, अभ्यास कशा पध्दतीने करावा, मुलाखतीची तयारी, कोणती पुस्तके वाचण्याची आवश्यकता आहे, परीक्षेला सामोरे जाताना प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी या विषयी मार्गदर्शन केले. रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे, विजयरत्न फडतरे, किरण तुरुकमारे, माधुरी वाघमारे, संतोष शिंदे, रोहीत कांबळे, नीरज भालेराव, अंजना गायकवाड, महेश गायकवाड यावेळी उपस्थित होते.

प्रभात Sat, 29 September 2018
epaper.eprabhat.net/c/3272835

दिनांक २९ सप्टेंबर २०१८




**दिनांक ३० सप्टेंबर २०१८**
**कासारसाई आणि पिंपरी येथिल अल्पवयीन मुलीवर झालेल्या**
**अत्याचार व निर्घृण हत्येचा जाहीर निषेध**

तरुण_भारत_संघटना यांच्या वतीने आयोजित कासारसाई आणि पिंपरी येथिल अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार व निर्घृण हत्येचा जाहीर निषेध व या घटनांना आळा घालण्या संदर्भात काय करावं या बाबत मार्गदर्शन करताना रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे , कार्याध्यक्ष अंजना गायकवाड ,प्रमुख उपस्थित नगरसेवक राहुलभाऊ भोसले, API वाघमारे, युवा नेते मुनाफ तरसगर, मंडल अध्यक्ष अजय पाताडे,किशोर गवळी,मनोज जाधव, आंनद नरवाडे, रयत विद्यार्थी विचार मंच पदाधिकारी -महासचिव संतोष शिंदे ,सहसचिव मेघा आठवले,शहराध्यक्ष रोहित कांबळे

लोकमत

## तरतूद नसल्याने योजना बारगळली : मुलांच्या जिवाची प्रशासनाला नाही पर्वा

# विद्यार्थ्यांच्या विम्याचा महापालिकेला विसर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना विमा संरक्षण देण्यात आले होते. ही योजना फक्त एक वर्षापुरती राबवून त्यानंतर बंद करण्यात आली. त्यामुळे शहरातील पालकांमधून नाराजीचा सूर येत आहे.

महापालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा खासगी कंपनीमार्फत विमा काढण्यात आला होता. शाळेत येताना व शाळेतून घरी जाताना तसेच इतरवेळेसही अपघात झाल्यास विद्यार्थ्यांच्या औषधोपचारासाठी आर्थिक मदत व्हावी यासाठी शिक्षण मंडळाने हा निर्णय घेतला होता.

त्यामध्ये ३७ हजार ६६४ विद्यार्थ्यांना विमा संरक्षण देण्यात आले होते. प्रत्येक विद्यार्थ्यामागे ४० रुपये घेण्यात आले होते. त्यानुसार १५ लाख पंधरा हजार रुपयांची विमा पॉलिसी काढण्यात आली होती.

या शैक्षणिक वर्षामध्ये एकाच विद्यार्थ्याला या विम्याचा फायदा मिळाला असला तरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही योजना लाभकारक होती. मात्र विमा योजना बंद केल्यामुळे पालकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. तसेच महापालिका प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या जिवाची पर्वा नाही का असा सवाल पालक करीत आहेत.

◆ पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा उतरावा, त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी, अशी मागणी महापौर राहुल जाधव यांनी केली आहे. याबाबत आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, महापालिकेच्या शाळेत सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेतात. विद्यार्थी अचानक आजारी पडल्यास, शस्त्रक्रिया करावी लागल्यास संबंधित



कुटुंबास आर्थिक परिस्थितीमुळे उपचाराचा खर्च करणे शक्य होत नाही. त्या वेळी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा शालेय विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा उतरविणे आवश्यक आहे. तरी महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व शालेय विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा उतरविण्यात यावा. यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करावी, असे पत्रात म्हटले आहे.

### अपघात झाल्यास पालकांना होतो भुर्दंड

◆ या विमा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा अपघात झाला तर त्याच्यावर औषधोपचार करण्यासाठी पालकांना आर्थिक हातभार मिळत होता. राज्य शासनाने पालकांना आर्थिक हातभार लागावा यासाठी २०१३ मध्ये राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना सुरु केली आहे. मात्र यासाठी अनेक निकष असल्याने महापालिकेने काढलेल्या पॉलिसीला पालकांची पसंती मिळत होती. विद्यार्थी हे उद्याचे भविष्य आहेत. भविष्यामध्ये हेच विद्यार्थी आपल्या शहराचे राष्ट्रीय व जागतिक पातळीवर प्रतिनिधित्व करणार आहेत. मात्र त्यांच्या सुरक्षेसाठी काढण्यात येणाऱ्या विमा पॉलिसी फक्त एक वर्षापुरत्या राबवून बंद केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व पालकांच्या आर्थिक हातभारासाठी काढण्यात आलेल्या विमा पॉलिसीचा महापालिका प्रशासनाला विसर पडला आहे का, असा सवाल पालक करीत आहेत.

> विमा पॉलिसीसंदर्भात या वर्षी अंदाजपत्रकात काही तरतूद केली नव्हती. त्यामुळे या वर्षी विद्यार्थ्यांचा विमा काढता आला नाही. सहामाही सत्र संपल्यानंतर सहा महिन्याचाच कालवधी शिल्लक राहत आहे. त्यामुळे विविध खासगी कंपन्यांकडे जाहिरात पाठवून विमा पॉलिसीसंदर्भात कंपन्यांची विम्यासंदर्भात माहिती घेतली जाईल.
>
> **- सोनाली गव्हाणे,** सभापती, शिक्षण मंडळ

> २०१६ या वर्षी विम्याची योजना राबवण्यात आली होती. त्यानंतर शिक्षण मंडळ बरखास्त झाल्यावर पुढे ही योजना बंद झाली. आर्थिक अंदाजपत्रकात काही तरतूद केली तर पुन्हा योजना चालू करता येईल.
>
> **- पराग मुंढे,** माध्यमिक शिक्षणाधिकारी पिं. चिं. महापालिका

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Sep 30, 2018
Powered by: erelego.com

महापालिकेच्या **105** शाळा **37** हजार **851** विद्यार्थी

# विद्यार्थ्यांना आरोग्य विम्याचे कवच



**पिंपरी, दि. ३० (प्रतिनिधी)** - पिंपरी-चिंचवड महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा काढला जाणार आहे. याकरिता अंदाजपत्रकात तरतूद करण्यासाठी महापौर राहुल जाधव यांनी पुढाकार घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक व माध्यामिक, उर्दू, हिंदी व इंग्रजी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा आहेत. त्यामध्ये एकूण ३७ हजार ८५१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पिंपरी-चिंचवड शहर ही उद्योगनगरी असून, महापालिकेच्या शाळेत कष्टकरी व गोरगरीबांची मुले शिक्षण घेतात. बहुतांशी विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती बेताची असते. ही मुले शिक्षण घेत असताना, या विद्यार्थ्यांना आरोग्याच्या समस्या भेडसावल्यास, वैद्यकीय उपचारांकरिता येणारा भरमसाठ खर्च परवडणारा नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांवर उपचार करताना पालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पिंपरीतील शाळेत विद्यार्थ्यांच्या भांडणातून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. त्यावेळी या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यावरुन अनेक बाबींचा विचार झाला होता. त्यानंतर या विद्यार्थ्याचा आरोग्य विमा नसल्याची बाब समोर आली होती. त्यानंतर अनेक संघटनांनी केलेल्या प्रयत्नानंतर या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली. याशिवाय काही महिन्यांपूर्वी शाळेतून परतत असताना यमुनानगर येथे एका विद्यार्थ्याला वीजेचा धक्का लागून मृत्यू झाला होता. याचे पडसाद महापालिका सभागृहात उमटले होते. या विद्यार्थ्याला नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली होती.

प्रभात विशेष

पहिलीपासून उच्च पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या राजीव गांधी विमा योजनेंतर्गत सुरक्षा कवच देण्यात आले आहे. मात्र, या योजनेत शासनाने अंशत: बदल केल्याने लाखो विद्यार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यासच मदत मिळणार आहे.

शासनाकडून २००३पासून राज्यातील सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालयांमध्ये पहिलीपासून ते उच्च पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी राजीव गांधी विमा योजना राबविण्यात येत होती. या योजनेत विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे संरक्षण देण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य हरविल्यास देखील भरपाईची तरतूद होती. तसेच लहानमोठे अपघात झाल्यास विद्यार्थ्यांना विमा संरक्षणाचे सुरक्षा कवच मिळत होते.

या विमा योजनेसाठी एका खासगी विमा कंपनीशी शासनाने करार केला होता. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांच्या संरक्षणार्थ विम्याचे हप्ते शासनाकडून भरण्यात येत होते. मात्र विमा कंपन्यांमार्फत विम्याचा लाभ मिळण्यासाठी अवलंबल्या जाणाऱ्या संथ पद्धतीमुळे शासनाने या योजनेत २००९-१०मध्ये अंशत: बदल करून, या बदलानुसार योजनेचे नाव राजीव गांधी सानुग्रह अनुदान योजना असे करण्यात आले आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना शासनाकडूनच सरळ लाभ देण्यात येणार आहे. तसेच लवकरात लवकर प्रस्ताव निकाली काढण्यात येणार आहे. गेल्या दीड वर्षात जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये मृत्यू झालेल्या सहा विद्यार्थ्यांच्या पालकांना मदत देण्यात आली आहे. मदतीसाठी प्रत्येकी ७५ हजार रुपये मदत देण्यात आली आहे.

> महापालिकेची आर्थिक क्षमता असताना देखील विद्यार्थ्यासारखा महत्त्वाचा घटक विम्यापासून वंचित राहत आहे. राज्य सरकारच्या राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह योजनेचा ठराविक कारणांसाठी लाभ मिळत आहे. महापालिका प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या आरोग्य विम्याबरोबरच अपघाती मृत्यू, अपंगत्व, अवयव निकामी या बाबींचा समावेश असलेला विमा काढावा. याकरिता प्रशासनास पत्र व्यवहार सुरू आहे.
>
> **- धम्मराज साळवे,** अध्यक्ष, रयत विद्यार्थी मंच

> महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने एखादा आजार उद्भवल्यास या पालकांची धावपळ होते. महापालिकेच्या वतीने या विद्यार्थ्यांना वीमा योजना लागू केल्यास या पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबाबत मी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याशी चर्चा केली आहे. प्रशासन देखील सकारात्मक असल्याने ही योजना लवकरच लागू केली जाईल.
>
> **- राहुल जाधव,** महापौर, पिंपरी-चिंचवड.

प्रभात Mon, 01 October 2018
epaper.eprabhat.net/c/32711658



रयत विद्यार्थी विचार मंचच्या 7 महिन्याच्या अविरत लढ्याला यश

पिं. चिं महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा मंजूर

**शाळांमधील विद्यार्थ्यांचा विमा उतरवा**

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या १३६ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचाने केली आहे. महापालिका शाळांमध्ये केवळ झोपडपट्टी व शोषित, पीडित, वंचित कुटुंबातीलच विद्यार्थी शिक्षण घेतात. महापालिकेच्या अनेक शाळा या रहदारीच्या ठिकाणी व रस्त्यालगत आहेत. त्यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांचे अपघात घडत असून विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला आहे. यासाठी महानगरपालिकेने महापालिकेच्या सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा, जीवन विमा उतरवणे गरजेचे असल्याचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, नीरज भालेराव यांनी महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रवीण अष्टीकर व स्थायी सभापती अध्यक्षा सीमा सावळे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**'शालेय विद्यार्थ्यांचा विमा मंजूर करावा'**

पिंपरी : महापालिकेच्या शाळेत आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेतात; परंतु अपघात झाल्यास त्यांच्याकडे उपचारासाठी पुरेसे पैसे नसतात. यासाठी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विमा योजना सुरू करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे करण्यात आली. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून, निवेदनात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महापालिकेच्या अनेक शाळा रस्त्यालगत; तसेच रहदारीच्या ठिकाणी आहेत; तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा खबरदारी घेत नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे; तसेच विद्यार्थ्यांना अपघात घडला, तर या विद्यार्थ्यांच्या पालकांना परवडत नाही. पुणे महापालिकेने शालेय विद्यार्थ्यांसाठी विमा मंजूर केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय विमा व जीवन विमा मंजूर करावा, अशी मागणी महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

**आता पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा उतरणार**

पिंपरी (महा ई न्यूज) – पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा उतरविण्यात यावा, त्यासाठी वार्षिक अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्याची सूचना महापौर राहूल जाधव यांनी आयुक्त श्रावण हार्डीकर यांना केली आहे.

यासंदर्भात महापौर जाधव यांनी आयुक्त हार्डीकर यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, महापालिकेच्या शाळेत सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिकतात. विद्यार्थी अचानक अजारी पडल्यास, त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागल्यास संबंधित कुटुंबियांना उपचाराचा खर्च परवडणारा नसतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा उतरविण्यात यावा. त्यासाठी महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी सूचना महापौर जाधव यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## दिनांक १ ऑक्टोबर २०१८
## वैद्यकीय विमा मंजूर

अत्यंत आनंद होतोय की रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून मागील ०७ महिन्यापासून आम्ही महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा वैद्यकीय विमा व जीवन विमा महापालिकेने मंजूर करावा म्हणून सतत निवेदने देऊन पाठपुरावा करत होतो आणि त्या प्रयत्नांना यश म्हणून आज त्यातली एक मागणी मान्य झाली आहे ती म्हणजे महापालिकेने वैद्यकीय विमा मंजूर केला आहे.त्याबद्दल प्रशासनाचे आभार..







## दिनांक ११ ऑक्टोबर २०१८
## राष्ट्रीय बालिका_दिन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे  माध्यमिक उर्दू स्कूल व  रयत विद्यार्थी विचार मंच आयोजित राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त आयोजित पाक कला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या  पाक कला स्पर्धेचे परीक्षक मुख्याधिपका उत्तरा कांबळे, संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे सामाजिक नेते शफीउल्ला काझी,इनामदार सर,अझहर सर होते.यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने प्रथम,द्वितीय,तृतीय विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व चतुर्थ उत्तेजनार्थ बक्षिस म्हणून १०१ रुपये म्हणून देण्यात आले.यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना पेन देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



पाककला स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसह उत्तरा कांबळे, धम्मराज साळवे, सलाम इनामदार, शफिउल्ला काझी आदी.

## राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त पालिकेच्या उर्दू शाळेत पाककला स्पर्धा

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे खराळवाडीतील उर्दू माध्यमिक विद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच संस्था आयोजित राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवून शाकाहारी, मांसाहारी व गोड पदार्थ बनवले होते. या पाककलेचे परीक्षक मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, संस्थापक धम्मराज साळवे, सलाम इनामदार, शफिउल्ला काझी होते. पाककला स्पर्धामधून चार विजेते ठरवण्यात आले. यामध्ये मोहम्मद शेख (प्रथम), शिफा सय्यद (द्वितीय), सना शेख (तृतीय) क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व उत्तेजनार्थ म्हणून रोख रुपये बक्षीस वतीने देण्यात आले. धमराज साळवे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सुप्त व कलागुणांना वाव द्यायचा असेल तर वेळोवेळी अशा स्पर्धांचे आयोजन केले पाहिजे. जेणेकरून भविष्यात त्यांना त्याचा फायदा होईल. याप्रसंगी डॉ. मशमुम नाजीर, हिना बागवान, संतोष शिंदे, रोहित कांबळे, मेघा आठवले, अंजना गायकवाड, भाग्यश्री आखाडे, कोमल बोर्डे, नीरज भालेराव, महेश गायकवाड, प्रीतम वाघमारे, आनंद विजापूरे उपस्थित होते.

Pimpri Edition
14 Oct, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**दिनांक १४ ऑक्टोबर २०१८**

**राष्ट्रीय बालिका दिन साजरा**

उर्दू माध्यमिक विद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने..





## दिनांक ०१ ऑक्टोबर २०१८

## खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेंवर नियंत्रण ठेवणेबाबत

खाजगी इंग्रजी माध्यमांची वाढती मुजोरी,पालकांशी उद्धट वागणे,आरटीई प्रवेश विद्यार्थ्यांना भेदभावाची वागणूक देने या वाढत्या मुजोरीला लगाम लावण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शाळा नियंत्रक पर्यवेक्षकाची जास्तीत जास्त संख्या वाढवावी व या खाजगी व इंग्रजी माध्यमांचा मनमानी कारभार थांबवावा.या मागणीसाठी रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने शिक्षण सभापती यांना निवेदन देण्यात आले.यावेळी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी खाजगी शाळा पालकांना विद्यार्थ्यांना अतिशय चुकीच्या पद्धतीने वागणूक देतात याबाबत जाणिव करून दिली.
यावेळी महासचिव संतोष शिंदे व निरज भालेराव उपस्थित होते.





## दिनांक १९ ऑक्टोबर २०१८
## विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी भवन  उभारणेबाबत

पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकामागची जी मोकळी पडीक जागा आहे त्या ठिकाणी व ते बाबासाहेबांच्या कार्याला साजेशे असेल असे विद्यार्थी  भवन निर्माण करावे.अश्या आशयाचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका  आयुक्त व महापौर यांना देण्यात आले.यावेळी त्यांनी यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

**पुढारी**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी भवन उभारावे

## धम्मराज साळवे यांची मागणी



आयुक्त श्रावण हर्डीकर यांना मागणीचे निवेदन देताना संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे.

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात अनेक विद्यार्थी नोकरीच्या शोधात, स्पर्धा परीक्षा देण्यासाठी तसेच शिक्षण घेण्यासाठी शहरात येत असतात. विद्यार्थ्यांना ना इलाजाने भरमसाठ पैसे देऊन हॉटेल किंवा इतरत्र राहावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होते. म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या पाठीमागे असलेल्या रिकाम्या जागेवर डॉ. बाबासाहेब यांच्या नावे विद्यार्थी भवन उभा करावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचचे संस्थापक धम्मराज साळवे यांनी केली आहे.

याबाबत आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, शहराचा कायापालट होत आहे तसा पुण्याबरोबरच पिंपरी चिंचवड शहराला ही शैक्षणिक नगरी म्हणून ओळख प्राप्त होऊ लागली आहे. आज महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी पिंपरी चिंचवड शहरात शिक्षणासाठी येतात. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांची परिस्थिती अतिशय हलाखीची असते. त्या विद्यार्थ्यांना खाजगी वसतिगृहामध्ये राहणे परवडत नाही. महापालिकेकडून अशा विद्यार्थ्यांसाठी सध्या तरी कोणतीही सुविधा नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक जगातील एक आदर्श विद्यार्थी म्हणून गणले जातात. आणि मागच्या वर्षी राज्यशासनाने ७ नोव्हेंबर बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन हा विद्यार्थी दिन साजरा करण्याचे घोषित केले आहे. म्हणून महापालिकेने ही बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत येत्या ७ नोव्हेंबर या दिवशी विद्यार्थी भवनाचे काम सुरु करावे. जेणेकरून सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना या विद्यार्थी भावनांचा उपयोग होईल व राहण्यास मदत होईल.यासाठी महापालिकेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक याच्या पाठीमागे जी जागा रिकामी आहे. त्या जागेवर डॉ. बाबासाहेब यांच्या नावे विद्यार्थी भवन उभा करावे, अशी मागणी केली आहे.

My Pimpri Edition
21 Oct, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**प्रभात** 4/16



पिंपरी : महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन देताना रयत विद्यार्थी मंचचे पदाधिकारी.

## महापालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी भवन उभारण्याची मागणी

**पिंपरी** – पिंपरी–चिंचवड शहरातील शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालयाची गुणवत्ता बघता हे शहर शैक्षणिकनगरी म्हणून नावारुपाला येत आहे. तसेच, या शहरात औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात असल्याने शहराची कामगारनगरी म्हणून ओळख आहे. यामुळे, शहरात देशाच्या विविध भागातून शिक्षणासाठी विद्यार्थी येत असल्याने विद्यार्थ्यांसाठी महापालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी भवन उभारावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली. याबाबत महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अध्यक्ष धम्मराज साळवे, संतोष शिंदे, मेघा आठवले, अंजना गायकवाड आदी उपस्थित होते. सध्याच्या काळात शिक्षणाचे बाजारीकरण झाल्याने पिडीत, वंचितांना शिक्षण घेणे अवघड झाले आहे. ज्या विद्यार्थ्यांची परिस्थिती चांगली आहे ते उबभ्रू ठिकाणी राहून शिक्षण पूर्ण करतात. मात्र, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचा राहण्याचा खर्च जास्त असल्याने गुणवत्ता असूनही शिक्षण घेताना कसरत करावी लागत आहे. या विद्यार्थ्यांना खासगी वसतिगृहात परवडत नाही. यामुळे, महापालिकेने विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी वसतिगृह उभारावे, असे निवेदनात म्हटले आहे.



## दिनांक १९ ऑक्टोबर २०१८
## सायन्स पार्कला भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम यांचे नाव देणेबाबत

पिंपरी चिंचवड शहरातील सायन्स पार्क हे नावाजलेलं ठिकाण असून वैज्ञानिक गोष्टींची माहिती देणार भांडार आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने सायन्स पार्कला भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचं नाव द्यावं व तसेच अब्दुल कलाम यांनी त्यांच्या आयुष्यात केलेल्या वैज्ञानिक कार्याची माहिती तेथे उपलब्ध करून द्यावी.पिंपरी चिंचवड महापालिकेने सायन्स पार्कला लवकरात लवकर भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचं नाव द्यावं अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने विनंती मा.आयुक्त यांच्याकडे केली.







## दिनांक ७ नोव्हेंबर २०१८
## विद्यार्थी दिन साजरा

७ नोव्हेंबर १९०० रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सातारा येथील शाळेत प्रवेश झाला होता.या निमित्ताने रयत विद्यार्थी विचार मंच च्या माध्यमातून विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला..बहूजन हिताय बहुजन सुखाय वाचनालयाचे संचालक गिरीष मोहन वाघमारे  हे प्रमुख मार्गदर्शक होते ,कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष शिंदे होते, प्रमुख उपस्थिती संस्थापक धम्मराज साळवे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड,सचिव नीरज भालेराव, सहसचिव मेघा आठवले,सहसचिव भाग्यश्री आखाडे, शहराध्यक्ष-रोहित कांबळे,सचिव समाधान गायकवाड ,उपाध्यक्ष महेश गायकवाड, उपाध्यक्ष वैभव कांबळे,प्रतीक वाघमारे,योगेश कांबळे,रुहिनाज शेख

प्रभात

3/16

## निवडक



**पिंपरी :** शाळा प्रवेश दिनानिमित्त रयत विद्यार्थी मंचच्या वतीने संविधान प्रास्ताविका व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

# रयत विद्यार्थी मंचच्या वतीने पिंपरीत विद्यार्थी दिन साजरा

**पिंपरी, दि. ७ (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाळेत घेतलेला प्रवेश दिन शहरात शाळा प्रवेश दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त रयत विद्यार्थी मंचच्या वतीने पिंपरीतील आंबेडकर उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा व संविधान प्रस्ताविकेचे पूजन करण्यात आले. संतोष शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी बहुजन हिताय, बहुजन सुखाय वाचनालयाचे संचालक गिरीष वाघमारे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० साली साताऱ्यातील राजवाडा चौक येथील प्रतापसिंह विद्यालयात प्रवेश केला होता. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी केलेल्या त्यांच्या योगदानाची संपूर्ण जगाने दखल घेतली आहे. त्यामुळेच राज्य सरकार हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करत आहे, असे त्यांनी सांगितले. धम्मराज साळवे, अंजना गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. रयतचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, सचिव नीरज भालेराव, सहसचिव मेघा आठवले, सहसचिव भाग्यश्री आखाडे, शहराध्यक्ष रोहित कांबळे, सचिव समाधान गायकवाड, उपाध्यक्ष महेश गायकवाड, उपाध्यक्ष वैभव कांबळे, प्रतीक वाघमारे, योगेश कांबळे, रुहिनाज शेख आदी उपस्थित होते.

**दिनांक ०८ नोव्हेंबर २०१८**



## दिनांक १९ नोव्हेंबर २०१८
## YCM कँटीन ची मान्यता रद्द करावी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे YCM (यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय) हे सर्वात मोठे हॉस्पिटल असून या ठिकाणी रोज शेकडो गरीब रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी येत असतात.या हॉस्पिटल मध्ये चालू असलेले कँटीन मध्ये चांगले व ताजे अन्न मिळत नाही.अतिशय महागड्या दरात हे अन्न मिळते.गरीब गरजू लोकांना हे परवडत नाही.म्हणून त्या कँटीन ची मान्यता रद्द करून त्या ठिकाणी अतिशय स्वस्त दरात कँटीन ला परवानगी देऊन ते दुसऱ्या सेवाभावी संस्थेला चालवायला द्यावे.जेणेकरून गरिब,गरजू रुग्णाला त्याचा फायदा होईल. अशा आशयाचे निवेदन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने देण्यात आले.

पुढारी

# 'वायसीएम'च्या कॅन्टीनचा ठेका रद्द करा

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (वायसीएम) कॅन्टीन ठेका रद्द करा. अल्प दरात खाद्य पदार्थ उपलब्ध करून देणाऱ्या संस्थेला ठेका देण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली. आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात ही मागणी करण्यात आली.

या वेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, नीरज भालेराव, मेघा आठवले, शहराध्यक्ष रोहित कांबळे आदी या वेळी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहरातील व शहराबाहेरील अनेक नागरिक पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचाराकरिता येतात. या मध्ये अनेक नागरिक व रुग्ण हे गरीब, गरजू, कष्टकरी कुटुंबांतील असतात. ते अधिकचा खर्च करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर उपाशी राहण्याची वेळ येत आहे. त्या करिता अल्प दरात खाद्य पदार्थ उपलब्ध करून देईल, अशा संस्थेला अथवा संचालकास कॅन्टीन नियमानुसार व निविदा प्रक्रिया करून सुपूर्द करण्यात यावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

Pimpri Edition
20 Nov, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**दिनांक २० नोव्हेंबर २०१८**





## २६ नोव्हेंबर २०१८
## संविधान दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून व भारतीय संविधानाच्या उदेशिकाचे वाचन केले या वेळी उपस्थित संस्थापक अध्यक्ष-धम्मराज साळवे,महासचिव संतोष शिंदे,कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, सहसचिव मेघा आठवले,रोजगार निर्माण परिषद अध्यक्ष-बाबुराव मदने साहेब, सुप्रसिद्ध गायक शेखर गायकवाड, अमोल डंबाळे,रोहित भागवत उपस्थित होते.

पुढारी



संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करताना विद्यार्थी.

## रयत विद्यार्थी मंचतर्फे संविधान दिन साजरा

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. एचए कंपनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व बाबुराव मदने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, सहसचिव मेघा आठवले, शेखर गायकवाड, अमोल डांबाळे, रोहित भागवत आदी उपस्थित होते.

My Pimpri Edition
28 Nov, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**संविधान दिन साजरा**

**दिनांक २८ नोव्हेंबर २०१८**



**दिनांक ०४ डिसेंबर २०१८**

**सावित्रीमाई फुले भवनानाध्ये सामाजिक सांस्कृतिक उपक्रमासाठी हॉल उपलब्ध करणे**

पिंपरी येथे सावित्रीमाई फुले भवनानाध्ये सामाजिक सांस्कृतिक उपक्रमासाठी हॉल उपलब्ध करणे संदर्भात महापौरांना निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने निवेदन देताना संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे,सोबत नगरसेवक संदीप वाघेरे..

०६ डिसेंबर २०१८

महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास अभिवादन



# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

December 6, 2018 shabnamnews



शबनम न्युज ;- ६ डिसेंबर बाबासाहेबांचा महापरिनिर्वाण दिन.या दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे व कार्यध्यक्ष अंजना गायकवाड यांच्या हस्ते एच.ए या ठिकाणी बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी,सचिव नीरज भालेराव,सहसचिव पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे,उपाध्यक्ष महेश गायकवाड,शहर सहसचिव समाधान गायकवाड,संदेश पिसाळ उपस्थित होते.यावेळी प्रभारी अध्यक्ष यांनी असे मत व्यक्त केले कि डॉ.बाबासाहेब यांनी अतिशय कमी कालावधीत

राजकीय,धार्मिक,शैक्षणिक,शेती,बांधकाम,वकील,अश्या सर्वच क्षेत्रात काम केलं. परंतु त्यांनी शिक्षणाची नाळ कधीच सोडली नाही,ते कायम स्वतःला विद्यार्थी समजत असत,हाच आदर्श आजच्या युवकांनी घेतला पाहिजे थोड्याश्या शिक्षणाने हुरळून न जाता कायम शिक्षण घेतलं पाहिजे.कारण शिक्षण हे अंतिम मुक्कामाच ठिकाण नसून तो जीवनाचा अखंड प्रवास आहे आणि तो कुठेही थांबता कामा नये.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा आठवले यांनी केले

**Share this post**

POSTED UNDER | पिंपरी चिंचवड

महाराष्ट्र उपाध्यक्ष सम्राट जकाते, शहर उपाध्यक्ष विलास गरड, लक्ष्मण मुदळे, बाबासाहेब कांबळे, शेषराव सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

**लोकजनशक्ती पार्टीतर्फे बाबासाहेबांना अभिवादन**

लोकजनशक्ती पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष विनोद सुंदर भालेराव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी महाराष्ट्र सचिव सचिन जाधव, मराठवाडा कार्याध्यक्ष शिवाजी झोडगे, सुरेश कांबळे आदी उपस्थित होते.

**युवक कॉंग्रेसचे बाबासाहेबांना अभिवादन**



पिंपरी चिंचवड शहर जिल्हा युवक कॉंग्रेसतर्फे डॉ. पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व संविधान प्रास्ताविकेच्या कोनशिलेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे उपाध्याक्ष गौतम आरकडे, युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, पिंपरी विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष हिराचंद जाधव, भोसरी विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष नासिर चौधरी, शहर सरचिटणीस गौरव चौधरी, अनिकेत आरकडे आदी उपस्थित होते.

**पुनावळे शाळेत महापरिनिर्वाण दिन**

पुनावळे येथील श्रीमती अनुसाई ओव्हाळ शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद ओव्हाळ, सचिव विश्वास ओव्हाळ, मुख्याध्यापक गणेश गवळी, एम. डी. नेवाळे, व्ही.के. भिताडे, वाय. ए. ढावरे, डी. जे. खैरनार, व्ही. एस. गायधने, आर. के. भालेराव आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. निकिता पऱ्हाड हिने सूत्रसंचालन केले. आरती बारबोले हिने आभार मानले.

**ज्ञानप्रभात विद्यालयात गीते व भाषण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म. फुले ट्रस्टच्या ज्ञानप्रभात विद्या मंदिर व विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांनी भाषणे व गीते सादर केली. कार्यक्रमात विठ्ठल गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन**

पिंपरी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



महापरिनिर्वाण दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे पिंपरीतील एच. ए. कंपनी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, सचिव नीरज भालेराव, सहसचिव पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे, उपाध्यक्ष महेश गायकवाड, शहर सहसचिव समाधान गायकवाड, संदेश पिसाळ उपस्थित होते.मेघा आठवले यांनी सूत्रसंचालन केले.

**बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी**

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष इश्वर कांबळे यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी जातीयवादी पक्षांना मतदान न करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. राम बनसोडे, अनिता सावळे, धीरज बगाडे आदी उपस्थित होते.

**डीबी निंबारकर शाळेत भाषण स्पर्धा**

चिंचवड येथील डीबी निंबारकर शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली. या प्रसंगी अॅड. दिलीप निंबारकर, आयुष निंबारकर आदी उपस्थित होते.

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहराध्यक्ष बबन साके व महिलाध्यक्षा रेश्मा पारधे यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भीमसृष्टीचे काम रखडले असून यासंदर्भात आयुक्तांविरोधात आंदोलन करणार असल्याचे बबन साके यांनी सांगितले. विजय भोसले, बापू केदारी, युवराज चंदनशिवे आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र बहुजन क्रांती सेना**

महाराष्ट्र बहुजन क्रांती सेनेच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विष्णू शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पांडुरंग शिंदे, सुभाष गायकवाड, गुलाबराव ससाणे आदी उपस्थित होते.

**समाजवादी पार्टी**

समाजवादी पार्टी पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने

My Pimpri Edition
7 Dec, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com



एचए कॉलनी, पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंचच्या पदाधिकाऱ्यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रभात Fri, 07 December 2018
epaper.eprabhat.net/c/34664004



## रयत विद्यार्थी विचार मंचाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

Posted By: news pcmc on: December 06, 2018
In: ताज्या घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर No Comments
Print Email

**न्यूज पीसीएमसी नेटवर्क**

**पिंपरी (दि. ६ डिसें.) :- रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) व पिंपरी चिंचवड शहर यांच्यावतीने विश्वरत्न.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.**

यावेळी प्रभारी अध्यक्ष संतोष शिंदे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, सचिव नीरज भालेराव, सहसचिव मेघा आठवले, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे आदी उपस्थित होते.

दिनांक ०७ डिसेंबर २०१८





०७ डिसेंबर २०१८

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) मावळ च्या वतीने विश्वरत्न.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साई,मावळ या ठिकाणी अभिवादन करण्यात आले यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, रोजगार निर्माण परिषद मावळ तालुका अध्यक्ष अजय यादव, शिक्षण समिती सदस्य साई विलास यादव,मेहुल ननवरे, समिर यादव, किरण पिंगळे, निखिल यादव सुरेश पिंगळे आदी जन उपस्थित होते.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना अतुल वाघमारे सर यांनी मार्गदर्शन केले.




हक्क शिक्षणाचा मागुनी, ज्ञानाची कास धरूया,
विद्यार्थी विचार मंच










विचार मंच



**दिनांक १७ डिसेंबर २०१८**
**प्रथम वर्धापन दिन साजरा**

रयत विद्यार्थी विचार मंच प्रथम वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी,सामाजिक शैक्षणिक,राजकीय,सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी संस्थेच्या कार्याला पुढील वाटचलीसाठी शुभेच्छा दिल्या.सन्माननीय उपस्थितीमध्ये स्वराज्य अभियान प्रमुख मानवजी कांबळे, पुढारी उपसंपादक प्रदीप लोखंडे, महाराष्ट्र पोलीस राजाभाऊ बारशिंगे,प्रभात पत्रकार विष्णू सानप,लोकप्रशासन मीडिया संचालक बाबा आखाडे,पिंपरी चिंचवड एज्युकेशन संचालक अकिल मुजावर,बहुजन हिताय बहुजन सुखाय वाचनालयाचे संचालक गिरीष मोहन वाघमारे,राष्ट्रवादी नगरसेविका निकिता कदम,रिपब्लिकन प्रदेश अध्यक्ष सुवर्णा डंबाळे, भिमसेना माथाडी कामगार नेत्या आरती ताई साठे,राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग गंगाताई धेंडे,भारिप बहुजन महासंघ नेते गुलाब पानपाटिल,रिपब्लिकन सेना मुळशी तालुका अध्यक्ष नितीन ओव्हाळ, आरपीआय नेते सुरेश रोकडे,संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सतीश काळे,भैय्यासाहेब,मैत्री चळवळ संदीप पिसाळ गजधने,महाराष्ट्र लाडके गायक फेम मला आमदार झाल्यासारखं वाटतंय संकल्प गोळे,बड्डे आहे भावाचा फेम गायक शेखर गायकवाड, गायक धीरज वानखेडे,गायक ओंकार रणधीर,गायक सागर हिपरगिकर,BSM LIVE NEWS प्रतिनिधी भीमराव तुरूकमारे, सुचिता तुरूकमारे,रुहीनाज शेख,कासीम शेख,अशपाक पटेल,अजय लोंढे,भारत मिरपगारे, प्रमोद सूर्यवंशी,अनिता सावळे,संगीत शहा,धम्मराज ग्रुप गौरव जाधव,युवा नेते विशाल अण्णा कांबळे,सामाजिक कार्यकर्ता अर्जुन दादा कदम सुधाकर बनसोडे, समर्थ मचाले उपस्थित होते.



दिनांक २७ डिसेंबर २०१८

पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

थोरस्वातंत्र्यसेनानी,शिक्षणमंत्री, कृषीमंत्री,शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक  यांना रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

दिनांक २८ डिसेंबर २०१८



पुढारी

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना धम्मराज साळवे, संतोष शिंदे आदी.

## डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

**पिंपरी :** शिक्षणप्रेमी डॉ. पंजाबराव देशमुख यांना जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रोहित कांबळे, अजय शेरखाने, शंकर वाघमारे आदी उपस्थित होते. धम्मराज साळवे म्हणाले की, पंजाबराव देशमुख यांनी ज्या प्रमाणे समाजातील शोषित विद्यार्थ्यांचा विचार करून शैक्षणिक कार्यात वाटचाल केली त्याच मार्गावर आम्ही रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेची वाटचाल करत आहोत. संतोष शिंदे म्हणाले की, पंजाबराव देशमुख शिक्षणमंत्री होते. त्यांनी कायम या पदाचा उपयोग समाजातील शोषित पीडित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपयोगासाठी व समाजाचे अज्ञान दूर करण्यासाठी केला. हाच आदर्श आजच्या शिक्षणमंत्र्यांनी घेतला पाहिजे.

My Pimpri Edition
28 Dec, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com







## दिनांक २८ डिसेंबर २०१८
## ख्रिस्त जन्मोत्सव सोहळा

ख्रिस्ती समाज विकास मंच यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ख्रिस्त जन्मोत्सव सोहळा २०१८ कार्यक्रमा मध्ये रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे ,कार्यध्यक्ष अंजना गायकवाड ,महासचिव संतोष शिंदे,मेघा आठवले,शहराध्यक्ष रोहित कांबळे यांचा शहराध्यक्ष दिपक चक्रणारायन यांनी सत्कार करून संस्थेला सेवा पुरस्काराने गौरविण्यात आले यावेळी संविधान राष्ट्र ग्रंथ देऊन ख्रिस्ती समाज मंच ला पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना.


Thank you